म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल वाङ्मय
दा. क्र. ५४५९

# हॅन्स अँडरसनच्या परीकथा ९



IRBK-0114049

सौ. सुमति पायगांवकर

ह्रा० क्र. १४०४९
५८ / ५।१२।८ / ३७४६

# हॅन्स् अँडरसनच्या परीकथा

भाग नववा

१४०४९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ....... नि .......
क्रमांक ...३७४६... नोंद दि. ५।१२।८२

सौ. सुमति पायगांवकर

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
ह्रा. क्र. १४०४९ नों दि ..........
वि. ..........
IRBK-0114049

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ति पहिली : ऑगस्ट १९७१

किंमत रु. २·००

चित्रकार :
**सुधाकर खासगीवाले**

प्रकाशक :
**स. कृ. पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पेठ : पुणे ३०

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी : मुंबई ४

सानेगुरुजी स्मृतिदिन
११-६-७१

छोटया मित्रमैत्रिणींनो,

हॅन्स अँडरसनच्या परीकथांचा हा ९ वा भाग तुमच्या हातात देत आहे. या भागात चार गोष्टी आहेत. त्यांतल्या दोन बऱ्याच मोठ्या आहेत. पहिली गोष्ट आहे धनगरीण आणि काजळीवाल्याची. धनगरीण ही धाकात वाढलेली, स्वतःचे निश्चित मत नसलेली अशी अर्धवट मनाची मुलगी आहे. तिच्या स्वभावामुळे ती काळजीवाल्याचा किती गोंधळ उडवते ते तुमच्या लक्षात येईल. दुसरी गोष्ट रूपकात्मक आहे. काही बडे लोक निरर्थक गोष्टींचे किती थोतांड माजवतात व त्यांना एखादे खमके माणूस भेटले की कशी सरळ वागतात हे मजेशीरपणे सांगितले आहे. या गोष्टीत मधेमधे तर बरीच लांबण वाटते. ती अँडरसनला टाळता आली असती तर माझा अनुवादही अधिक सुटसुटीत झाला असता. टिल्लयावेताळाची गोष्ट सुरेख आहे. माणसाच्या पोटाच्या भुकेपेक्षा बुद्धीची भूक किती प्रभावी असते आणि बुद्धिवान माणूस अखेर खऱ्या आनंदासाठी कसा धडपडतो हे या गोष्टीत दाखविले आहे.

चौथी गोष्ट सावली तर गमतीदारच आहे. एखाद्याच्या सरळपणाचा व विश्वासाचा फायदा घेऊन दुसरा एखादा लबाड माणूस त्याचा किती भयंकर घात करू शकतो हे या गोष्टीत छान दाखविले आहे. जगात आपण कोणत्या मित्रावर किती विश्वास ठेवायचा व मित्राची पारख कशी करायची याबदल या गोष्टीतून बरेच शिकता येईल.


तुमची
**सौ. सुमति पायगांवकर**

१७८ ए, हिंदु कॉलनी,
दादर, मुंबई १४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | धनगरीण आणि काजळीवाला | १ |
| २. | सॉसेजच्या सळईचे सार | १५ |
| ३. | किराणेवाल्याचा टिल्ल्यावेताळ | ३२ |
| ४. | सावली | ४२ |



# धनगरीण आणि काजळीवाला

तुम्ही कधी ओकच्या लाकडाचे, वर व्हारनिश नि कोरीव काम असलेले, जुन्या तऱ्हेचे नि अगदी जुने जीर्ण झालेले असे एखादे कपाट पाहिलेत का? वर्षानुवर्षांचे जुने असल्याने काळे पडलेले आणि फळ्यांवर साऱ्याभर पानाफुलांची वेलबुट्टी कोरलेले असे कपाट पाहिलेत?

एकदा, एका दिवाणखान्यात अशा प्रकारचे एक कपाट उभे होते. थेट पणजीबाईंच्या काळापासून वापरीत असलेले नि आजच्या

मालकिणीला वारसा म्हणून मिळालेले असे कपाट होते ते. अगदी वरपासून खालपर्यंत त्याच्यावर गुलाबांची नि ट्यूलिपची फुले कोरलेली होती. वेलबुट्टीदेखील फार निराळ्याच तऱ्हेची होती. वेलबुट्टीत मधे मधे मोठाल्या नि वाकड्यातिकड्या शिंगांचे छोटे छोटे सांबर डोकी बाहेर काढून डोकावत असलेले दाखवले होते.

कपाटाच्या मध्यभागी मात्र एक पूर्ण मनुष्याकृती कोरली होती. तो मनुष्य दिसायला भारी गमतीदार होता. त्याने आपले दात थेट या टोकापासून तो त्या टोकापर्यंत विचकलेले होते. पण त्याला तुम्ही त्याचे ते हसू असेल असे खासच म्हणणार नाही. त्याचे पाय वाकडेतिकडे दाखवले होते. त्याला दोन शिंगे होती नि दाढीही होती. घरातल्या मुलांनी त्याचे नाव, **श्रीयुत वाकडपाय–जंगबहादुर–रणधुरंधर–शूरवीर–सवाई शिलेदार** असे ठेवले होते! आणि हे लांबलचक नाव उच्चारायलाही अवघड नि मजेदार वाटे. शिवाय लाकडावर किंवा दगडावर कोरलेल्या माणसातल्या सर्वांनाच एवढ्या मोठ्या बहुमानाच्या पदव्या कुठून मिळणार? म्हणून घरातल्या मुलांनी त्या माणसाला त्या पदव्या मुद्दाम बहाल केल्या होत्या.

मंडळी! त्या कपाटावरची ही श्री. वाकडपायांची कोरीव आकृती कशी दिसत असेल त्याची तुम्हीच कल्पना करा. हा विचित्र माणूस सतत तिथे तसाच उभा असे आणि त्याची नजर मात्र समोरच्या आरशाच्या टेबलावर सतत एकटक तशीच खिळलेली असे! त्याचे कारण असे की त्या टेबलावर एक चिनी मातीची छोटी धनगरीण बाहुली ठेवलेली होती. तिच्या फ्रॉकचा घेर सुरेख फैलावला होता आणि कमरेवर त्याला गुलाबाचे फूल लावले होते. तिच्या जोड्यावर नि हॅटवर सोनेरी गिलिट होते आणि तिच्या हातात धनगराची काठी होती. ती धनगरीण फारच गोड दिसत होती.

धनगरणीच्या जवळ तिच्याचसारखा चिनी मातीचा बनवलेला, धुरांडी झाडणारा एक छोटा काजळीवाला बाहुला उभा होता. इतर कोणाही सारखाच तो स्वच्छ नि छानदार दिसत होता. इतका छान की त्या चिनीमातीवाल्याला त्याचा एखादा राजपुत्रही सहज बनवता आला असता. त्यात त्याला जराही प्रयास पडला नसता. त्याला फक्त त्याच्या जाम्यानिम्यावरून काजळीवाला म्हणत एवढेच. एरवी त्याच्या अंगचा कोळशासारखा काळा रंग सोडला तर त्याचा चेहरा एखाद्या मुलीसारखा गुलाबी नि मोहक होता! बनवणाराची ती चूकच होती वास्तविक. त्या काजळीवाल्याचा चेहराही काळसर हवा होता. खरे की नाही?

तो काजळीवाला धुरांड्यात वर चढायच्या आपल्या शिडीनिशी इतक्या थाटात उभा होता कि वाः! त्या धनगर मुलीच्या बराच जवळ उभा होता तो. ती दोघेही प्रथमपासूनच तशी जवळजवळ उभी होती. कारण त्यांना तसेच मांडण्यात आले होते.

एकमेकांच्या जवळ असल्यामुळे दोघांची दाट ओळख झाली आणि त्यांनी आपसात लग्नही ठरवून टाकले. दोघेही एकमेकांना अनुरूप



होते, वयाने तरुण होते, एकाच चिनीमातीचे बनले होते आणि दोघेही सारखेच ठिसूळ नि नाजूक होते.

त्या दोघांच्या जवळच त्यांच्याहून तिप्पट मोठया आकाराची अशी एक आणखी आकृती होती तिथे. तो एक मान हलवणारा, वड्या हुद्दयाचा असा चिनी अधिकारी होता. आपण त्या धनगर मुलीचे आजोबा लागतो असे तो तिथल्या सर्वांना सांगे आणि तो देखील चिनी-मातीचाच बनवलेला असून त्याला चिनी मँडेरिन म्हणत. तो आजोबा लागत असल्याचे त्याला पटवून मात्र कधीच देता आले नाही. तरीही तो म्हणे की त्या तरुण धनगर मुलीवर त्याचा संपूर्ण अधिकार होता आणि म्हणूनच त्या श्री. वाकडपाय–जंग–बहाद्दराने त्या धनगर मुलीला घातलेल्या मागणीला त्याने आपली मान हलवून रुकारही दिला होता! तो श्री. वाकडपाय जेव्हा जेव्हा त्या धनगरणीकडे पाही तेव्हा तेव्हा वारंवार आपली मान हलवून त्याच्या मागणीला हा मँडेरिन आपला होकार देई!

तो चिनी मँडेरिन त्या धनगर मुलीला एक दिवस मग म्हणाला,

"हंऽऽ. तुझ्यासाठी आता नवरा शोधायला हवा बरं का. ज्याला मी तुझा भावी पती म्हणून पसंत केला आहे तो मला वाटतं अगदी भारीपैकी शिसवी लाकडाचा बनवलेला आहे. तुझं त्या समोरच्या, जंगबहाद्दर–रणधुरंधर–शूरवीर–सवाई शिलेदार श्रीयुत वाकडपायांशी

लग्न लावून द्यायचंय बरं का. समजल ना? त्या कपाटात गच्च भरलेली जी चांदीची ताटं नि भांडी आहेत ना ती त्याच्याच मालकीची आहेत सगळी. शिवाय त्या तळाच्या चोर-खाणातलेही सगळे काही त्याचेच आहे...."

"शीः! मला नाही जायचं त्या अंधाऱ्या कपाटात!" ती छोटी धनगरीण झणक्यात म्हणाली. "शिवाय कोणाला तरी असं बोलताना मी ऐकलंय की त्या कपाटावरच्या माणसानं आपल्या पहिल्या अकरा बायका कैद करून ठेवल्या आहेत. आणि त्या सगळ्या चिनी मातीच्या आहेत." धनगर मुलीने वाक्य पूर्ण केले.

चिनी मँडेरिनने उत्तर दिले, "वाहवा, तर मग तू बारावी बायको होशील! आणि त्या बायकांची चांगली सोबतही होईल तुला! अगदी आजच्या आजच, जेव्हा त्या कपाटातून रात्री कुरकुर आवाज निघेल तेव्हा त्या मुहूर्तावर तुझा लग्नविधी निश्चितच पार पडेल. खात्री असू दे. या चिनी मँडेरिनचे शब्द आहेत हे. समजलीस!" असे म्हणून त्याने आपली मान हलवली आणि गाढ झोपी गेला तो.

परंतु बिचारी ती छोटी धनगरीण खूप रडली त्याचे बोलणे ऐकून. ती मग आपल्या त्या चिनीमातीच्या जिवलग मित्राकडे, काज-ळीवाल्याकडे वळून म्हणाली,



"मला वाटतं, जगात दूर कुठं तरी मला घेऊन चल तू. चलशील? आपण इथं राहाणं मुळीच योग्य नाही."

छोट्या काजळीवाल्याने उत्तर दिले, "तू सांगशील ते करायला तयार आहे मी. चल जाऊया ताबडतोब. मला वाटतं माझ्या या धंद्यात तुझं पोट मी सहज भरू शकेन."

उसासा टाकीत ती म्हणाली," या टेबला-वरून जर का तुला बाहेर निघता आलं असतं तर!–कारण बाहेर दूर कुठंतरी त्या उघड्या अफाट जगात गेल्याशिवाय मला मुळीच चैन पडणार नाही."


त्याने तिला समजावले. तिने आपले पाऊल त्या कोरलेल्या कडांवर आणि नि टेबलाच्या पायाभोवती वेढलेल्या रंगित वेलबुट्टीवर कसे टेकायचे ते दाखविले. परंतु त्या जुन्या कपाटाकडे मागे नजर टाकताच त्यांना फार मोठी खळबळ माजलेली दिसली! प्रत्येक छोट्या सांबराने आपली बाहेर डोकावणारी मान आणखीनच पुढे काढली होती. शिंगे टवकारली होती. आणि त्याचवेळी त्या जंगबहादर–रणधुरंधर–शूरवीर–सवाई शिलेदार श्रीयुत वाकडपायाने ताडकन उसळी मारली आणि मोठ्यांदा आरडाओरडा करीत तो त्या चिनी मँडेरिनला म्हणाला, "पहा, पहा–ती दोघं पळून जाताहेत, अहोऽ–पळून जाताहेत–"


परंतु ती दोघे किंचितही घाबरली नाहीत. त्यांनी बचावासाठी पटकन एका उघड्या खणात उडी घेतली.

या खणात तीन की चार अपुऱ्या पत्त्यांचे, पत्तेजोड पडले होते. शिवाय एक खेळण्यातले नाट्यगृहदेखील होते तिथे. नाट्यगृहात नाटक चालू होते. पत्त्यातल्या सर्व राण्या–चौकट, बदाम, इस्पिक नि किल्वर–पुढच्या रांगेत बसल्या होत्या. त्यांच्या हातातल्या फुलांनी त्या वारा घेत होत्या. त्यांच्या पाठीमागे गुलाम उभे होते. मारे ऐटीत ते आपल्याला असलेली–एक खाली एक वर–अशी दोन्ही डोकी सर्वांना दाखवीत होते. ते नाटक एकमेकांवर प्रेम करणाऱ्या दोन व्यक्तींबद्दल होते. ते पाहून आपली धनगर मुलगी तर खूप रडली बिचारी. कारण तिच्या स्वतःच्या कथेसारखीच होती त्यांची पण कथा.

ती काजळीवाल्याला एकदम म्हणाली, "सहन होत नाही रे मला हे. या खणा-तून बाहेर जाऊ या कुठेतरी."

परंतु खणातून पुन्हा जमिनीवर येताच त्यांनी वर आरशाच्या टेबलावर पाहिले. त्या म्हाताऱ्या चिनी मँडेरीनला आता जाग आली





होती. आणि संतापाच्या भरात त्याचे संबंध शरीर पुढेमागे गदगदा हलत होते!

छोटी धनगरीण ओरडली, "बापरे! तो म्हातारा मँडेरिन येतोय मागे...." काकुळतीने तिने पटकन आपले गुडघे टेकले त्या काजळीवाल्यापुढे.

"थांब – एक पटकन कल्पना आलीय माझ्या डोक्यात." तो काजळीवाला म्हणाला. "त्या कोपऱ्यात असलेल्या भल्या मोठ्या फुलांच्या कुंडीतच जर आपण हळूच शिरलो तर? तिथं आपण गुलाब नि लव्हेंडरच्या फुलांवर टेकून विश्रांती घेऊ जरा. आणि तो जर का जवळ आला तर?–तर त्याच्या डोक्यात मीठच फेकू." काजळीवाला म्हणाला.


ती पटकन उत्तरली, "नको हं. छेः मुळीच नाही जमायचं ते. शिवाय मला पक्कं ठाऊक आहे की त्या कुंडीशी त्या मँडेरिनचं मागे लग्न ठरलं होतं. आणि अजूनही त्यांची थोडीशी मैत्री आहे नक्कीच. अंहं! उपायच नाही दुसरा. एवढ्या मोठ्या जगात कुठंतरी दूरच भटकणं भाग आहे आपल्याला."

काजळीवाल्याने तिला विचारले, "एवढ्या मोठ्या जगात माझ्याबरोबर दूर दूर भटकायची खरंच तयारी आहे तुझी? हे जग किती मोठं आहे आणि कदाचित आपल्याला घरी कधीच परत पुन्हा येता येणार नाही याचा विचार केलास का कधी?"

"हो केला आहे." तिने उत्तर दिले.

काजळीवाल्याने तिच्याकडे एकदा निरखून पाहिले नि तो म्हणाला,

"माझा रस्ता नेहमी या धुरांड्यातून आहे. भट्टीतून सरपटत वर बोगद्यातून नि भोंग्यातून चढायचं धैर्य आहे तुझ्यात? मला तो रस्ता चांगला अवगत आहे. आपण इतक्या इतक्या उंच जाऊ की ते आपल्या जवळपास येऊच शकणार नाहीत. अगदी वरच्या टोकाला एक गुहेसारखी पोकळी आहे. तिथून आपण अगदी मोकळ्या जगातच येतो मग!"



असे म्हणून त्याने तिला हाताला धरून भट्टीच्या दाराजवळ नेले.

निःश्वास टाकत तिने म्हटले,

"बाई गऽ! किती काळी दिसते ही." तरीही ती त्याच्या बरोबर गेली—त्या—बोगद्यातून नि भोंग्यातून—जिथे काळोख होता—काळाकुट्ट काळोख!

"आता आपण मुख्य धुरांड्यात आलो आहोत बरं का....आणि पहा जरा वर....किती मोहक सुंदर तारा चमकतो आहे तो आपल्या डोक्यावर." तो म्हणाला.


आणि खरोखरीच आकाशात एक सुंदर तारा थेट त्यांच्याच डोक्यावर चमचम करीत होता....जणू त्यांना वाट दाखवीत होता तो!

वर वर जाताना ती दोघे ओणव्याने जात होती. सरपटत होती. अत्यंत भयद रस्ता होता तो त्यांचा....अगदी उंच....केवढा केवढा उंच! परंतु तो तिला आधार देत होता. वाट दाखवीत होता आणि तिचे चिनीमातीचे ते चिमुकले पाय जिथे घट्ट रोवता येतील त्या अचूक जागा दाखवीत होता. सरतेशेवटी त्या धुरांड्याच्या वरच्या काठावर आले ते. तिथे विश्रांतीसाठी जरा बसले दोघेही. फार फार थकवा आला होता त्यांना आणि तोही त्यांच्या यथार्थ कारणासाठी.

तारांनी मढलेले झगमगते आकाश वर, डोक्यावर होते, आणि घराच्या छपरांनी मढलेले सबंध गाव त्यांच्या पायातळी होते! अफाट विशाल जग त्यांच्या सभोवती पसरले होते.

बिचाऱ्या त्या गरीब मुलीने अशा तऱ्हेच्या उघड्या मोकळ्या जगाची कल्पनाच केली नव्हती कधी. भेदरून तिने आपले डोके त्या काजळीवाल्याच्या दंडावर टेकले. मग इतक्या ओक्साबोक्शी रडू लागली ती की तिच्या कंबरपट्ट्याचा रंगदेखील धुवून गेला त्या रडण्याने!


धनगर मुलगी हुंदके देत म्हणाली, "ही म्हणजे हद्द झाली आता. मला जरा देखील सहन होत नाही रे हे जग!....हे जग तर फार म्हणजे फारच मोठं दिसतंय! आता



करू तरी काय ? खरंच, पुन्हा जर का मला त्या माझ्या आरशाच्या टेबलावरच जाता आलं असतं तर! तिथं परत गेल्याखेरीज मला मुळीच समाधान वाटणार नाही. या उघड्या अफाट जगात मी तुझ्या मागेमागे उगाच आले. आता, तुझं जर माझ्यावर खरंखुरं प्रेम असेल तर माझ्या मागेमागे तू घरी परत चल!"

त्या काजळीवाल्याने तिची खूप समजूत घातली. त्या म्हाताऱ्या चिनी मँडेरीनची तिला आठवण करून दिली. त्या श्रीयुत वाकडपाय, जंगबहादुर– रणधुरंधर – शूरवीर – सवाई शिलेदाराचीही आठवण करून दिली. परंतु ती इतकी रडत होती नि त्या छोट्या काजळीवाल्याला इतकी बिलगत होती की सरतेशेवटी कितीही वेडेपणाचे असले तरी तिच्या मनाप्रमाणेच करणे त्याला भाग पडले.

मोठ्या मुष्किलीने ते त्या धुरांड्यातून, लोंबकळत, खाली उतरत होते. ते भोंग्यातून नि बोगद्यातून खाली आले आणि सरतेशेवटी त्या काळ्याकुट्ट भट्टीतही आले. परंतु भट्टीच्या दाराशी तिथेच रेंगाळत राहिले ते. खोलीत शिरण्याआधी तिथे काय चालले आहे ते ऐकायचे होते त्यांना. तिथे सर्व काही शांत होते. म्हणून त्यांनी बाहेर पाऊल टाकले. आणि ?....



अरेरे! जमिनीवर तो चिनी मँडेरीन अस्ताव्यस्त पडला होता! पळून जाणाऱ्या त्या दोघांच्या पाठलागाच्या धांदलीत तो टेबलावरून खाली पडला आणि त्याचे तीन तुकडे झाले!

त्याचे मुंडके पार धडावेगळे झाले होते आणि तो श्रीयुत वाकडपाय–जंगबहादुर–रणधुरंधर–शूरवीर–सवाई शिलेदार तिथे झालेल्या घडामोडींचा विचार करीत नेहमीसारखा जागच्याजागीच उभा होता.

"अयाईऽऽ केवढं भयंकर!...म्हाताऱ्या आजोबाचे तुकडे तुकडे झालेत आणि ते आपल्यामुळे! बाई गऽऽ–सहनच होणार नाही मला!...." असे म्हणून ती धनगरीण आपले छोटे हात जोरजोरात चोळू लागली.

काजळीवाल्याने तिचे सांत्वन केले, "त्याला परत जोडता येईल सहज. गोंधळून जाऊ नकोस अशी. मान व आजोबांच्या पाठीचे तुकडे नीट चिकटवले आणि मानेत एक मजबूतसा फिरकीचा खिळा घातला तर आजोबा पुन्हा नव्यासारखे होतील. आणि मग ते आपली भरपूर कानउघाडणी करू शकतील."

"तुला खरंच वाटतंय का तसं?" तिने त्याला विचारले. मग ती दोघे परत त्या आरशाच्या टेबलावर चढली आणि आपल्या पूर्वीच्या जागी जाऊन उभी राहिली.

काजळीवाला म्हणाला, "पहा, आपण केवढ्या केवढ्या लांब गेलो होतो...एवढा सगळा खटाटोप करायची वास्तविक गरजच नव्हती."

"पण आजोबांना जर का पुन्हा नीट करता आलं तर? किती बरं होईल.—फार खर्च येईल का रे त्याला...." धनगरणीने प्रश्न केला.


अखेर तो मँडेरिन जोडला गेला. त्या घरातल्या माणसांनी त्याची पाठ चिकटवली आणि त्याच्या मानेत फिरकी बसवली. अगदी नव्यासारखा झाला तो–फक्त एवढेच की पूर्वीसारखी तो मान मात्र हलवू शकेना.

ते पाहून श्रीयुत वाकडपाय – जंगबहादुर – रणधुरंधर – शूरवीर – सवाई शिलेदार त्या चिनी मँडेरीनला म्हणाला, "तुझे ते फुटून तुकडे तुकडे झाल्यापासून भारी घमेंडीत आला आहेस तू. खात्रीनं सांगतो तुला. मला वाटतं त्याप्रमाणे म्हणायचं तर अशी घमेंड वाटण्याजोगं तसं काहीच घडलेलं नाही..... नक्की काय ते उत्तर देऊन टाक–तिचं माझ्याशी लग्न होणार आहे की नाही?"....

त्या म्हाताऱ्या मँडेरीनकडे तो काजळीवाला आणि ती धनगर मुलगी अगदी काकुळतीने पाहू लागली. तो चुकून कदाचित मान हलवील नि होकार देईल म्हणून इतकी घाबरली होती ती! परंतु त्याची मान त्याला हलविता येणे शक्यच नव्हते. आणि श्रीयुत वाकडपाय-सारख्या तिऱ्हाईत माणसाला–आपल्या मानेत फिरकी बसवली आहे हे सांगणे मँडेरिनला किती नामुष्कीचे!

अर्थातच मग चिनीमातीची ही दोन तरुण मुलेच लग्न होऊन कायम एकत्र राहिली. त्यांनी आजोबांच्या मानेतल्या फिरकीचे खूप खूप आभार मानले. काजळीवाला आणि धनगरणीने, पुढे कधीकाळी फुटून तुकडे होईतो एकमेकांवर खूप प्रेम केले.





# सॉसेजच्या सळईचे सार

"**बा**ई, बाई! काल अशी अप्रतिम मेजवानी होती आम्हांला!" एक वयोतीत उंदरीण त्या मेजवानीला हजर नसलेल्या दुसऱ्या एका उंदरिणीला सांगत होती.

"उंदीरमहाराजांच्या बैठकीपासून मी एकविसाव्या बैठकीवर बसले होते. तसा काही वाईट नव्हता तो मान. बुरशी आलेला पाव, चरबीची मेणबत्ती, आणि सॉसेज असे सारे उंची पदार्थ होते मेजवानीला. सारे पदार्थ वाढण्याची एक पाळी संपल्यावर तेच पदार्थ दुसऱ्याही पाळीत पुन्हा भरपूर वाढले आम्हांला. म्हणजे बाई, दोन मेजवान्याच झाल्यासारखं झालं ते! आम्ही सगळे मारे हंसून खेळून वागत होतो अगदी! आणि इतक्या गप्पा नि कोट्या चालल्या होत्या आमच्या कि जसे आम्ही सारे एकाच घरातले!

आमच्या पानात तर सॉसेजच्या सळयांच्या खेरीज काही म्हणता काही सुद्धा शिल्लक उरलं नव्हतं. म्हणून मग आमच्या गप्पांना तोच विषय मिळाला. सरतेशेवटी गप्पांच्या ओघात आम्ही त्याच्या म्हणीकडेच वळलो. म्हण आहे 'सॉसेजच्या सालींचे सार' किंवा शेजारच्या देशातले लोक म्हणतात तसं, '**सॉसेजच्या सळईचे सार**'. ही म्हण तर सगळयांनीच


ऐकलेली होती पण हे **सार** मात्र कोणीच चाखलेलं नव्हतं. आणि प्रत्यक्ष तयार तर कोणीच केलं नव्हतं !

या साराच्या संशोधकाला सर्वांकडून धन्यवाद देण्यात आले आणि आमच्यातलं कोणीतरी हे देखील म्हणालं की त्या संशोधकाला तर 'गरिबांचा कैवारी' अशा हुद्यावर एखादं अधिकारपदच द्यायला हवं ! गम्मतच नाही का ? मग आपले वयस्क उंदीर राजेसाहेब बोलायला उभे राहिले. त्यांनी तर असं जाहीर केलं की जी उंदीर-तरुणी हे एवढं गाजलेलं नि चवदार **सार** शक्य तितक्या उत्कृष्ट रीतीनं तयार करायचं शिकून येईल तिला राजेसाहेब आपली राणी बनवतील ! हे शिकून तयार होण्यासाठी त्यांनी एक वर्ष, एक दिवसाची खास लांबलचक मुदत दिली आहे."

दुसरी उंदरीण म्हणाली, "काही वाईट नव्हती राजेसाहेबांची ही सूचना. पण हे **सार** करतात कसं ?"

"अहो, मी सांगण्याइतकं सोपं नाही काही ते ! साऱ्या उंदीर-तरुणी तोच तर प्रश्न विचारीत होत्या. त्यांना राणी व्हावंसं तर फार वाटत होतं. पण जगात ठिकठिकाणी फिरून ते कसं करतात ते शिकायचे श्रम करायला कोणीच तयार होईना. उत्तम सार करता यायला फिरायलाच हवं ठिकठिकाणी. राणी व्हायचं भाग्य पुढ्यात असलं तरी त्यासाठी प्रत्येकीलाच काही आपल्या मंडळीतून इतर ठिकाणी दूर जायला, किंवा घरातला शेकोटीजवळचा ऊबदार कोपरा सोडून कुठेतरी रखडत राहायला आवडणार थोडीच ? परक्या देशात, चीजच्या काठाची सालं नि डुकराचं खारवलेलं सुकं मांस दरदिवस मिळवणं इतकं काही सोपं नसतं हो ! आणि म्हणून उपासमार सहन करायला किंवा सरतेशेवटी जिवंतपणी मांजराच्या पोटात जायला कोणाला आवडणार ?"

त्या वयस्क उंदरीणबाईने सांगितलेले हे विचार मनात आल्यामुळेच बहुतेक बऱ्याचशा



जणींनी देशाटन करून **सार** करायला शिकायचा विचार साफ सोडून दिला.


फक्त चौघींनी मात्र जाहीर केले की त्या देशाटनाला जायला तयार होत्या. त्या चौघी तरूण होत्या. अगदी तरतरीत होत्या, पण बिचाऱ्या गरीब होत्या. प्रत्येकीने, जगाच्या चार दिशांपैकी एकीकडे जायचे ठरवले. त्यात कोणत्या दिशेला भाग्य उजळते ते त्यांना पाहायचे होते. प्रत्येकीने सॉसेजची एकेक सळई आपला प्रवासी दंडा म्हणून बरोबर घेतली होती. शिवाय त्यामुळे, त्या ज्या उद्देशाने एवढ्या साहसी प्रवासाला निघाल्या होत्या तो उद्देशही त्यांच्या नजरेपुढे राहाणार होता.

मे महिन्याच्या सुरवातीलाच त्या घराहून निघाल्या. परंतु पुढल्या वर्षाच्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेपर्यंत त्यांतली कोणीच परत आली नाही! त्यानंतर ज्या आल्या त्या अवघ्या तिघीच! निकालाचा दिवस अगदी जवळ येऊन ठेपला तरी चौथीचे काहीच चिन्ह दिसेना.

"हो, अगदी बरोबर. आपल्या अत्यानंदात कुठेतरी काही अडचण नेमकी उभी राहात असते. नियमच आहे असा!" उंदीरमहाराज म्हणाले. लगेच त्यांनी अनेक मैलांच्या परिसरातील साऱ्या उंदरांना तातडीचे बोलावणे पाठवले. त्यांची प्रशस्त सभा स्वैपाकघरात एकत्र भरणार होती आणि त्या तीन प्रवासी उंदीर—तरुणी ओळीने त्या सभेसमोर उभ्या राहणार होत्या. चौथ्या तरुणीच्या जागी तिच्याऐवजी, क्रेप कागदात गुंडाळलेली सॉसेजची एक सळईच उभी रोवली जाणार होती.

राजा स्वतः काही बोलेपर्यंत, कोणालाही स्वतःचे मत प्रकट करण्याची हिंमतच नव्हती. राजाने त्या तिघींतल्या एकीला आपली हकीगत सांगण्याची आज्ञा केली. ती काय सांगत होती ते आपण ऐकू या आता.

"जेव्हा मी जग पाहायला प्रथमच पाऊल टाकले...." ती छोटी उंदीर तरुणी म्हणाली, "तेव्हा माझ्या वयाच्या इतर पुष्कळजणी



**पहिल्या छोट्या उंदरिणीने आपल्या प्रवासात काय काय पाहिले नि ऐकले—**

सारखं मलाही वाटत होतं की मला सर्व काही पूर्ण कळतंय. पण प्रत्यक्षात ते तसं नव्हतं. पुष्कळसं ज्ञान वाढायला अनेक वर्षं लागतात. मी निघाले ती लगेच उत्तरेकडे प्रवासाला निघणाऱ्या एका सागरी जहाजावर गेले. मला सांगण्यात आलं होतं की जहाजावरच्या स्वैपाक्याला प्रत्येक पदार्थ यावाच लागतो. आणि बुरसटलेलं पीठ, मोठाली पिंपं भरून साठवलेलं, खारवलेलं मांस आणि डुकराच्या सुक्या मांसाच्या कडांचा उपयोग करून ते पदार्थ सहज शक्य असतात. बोटीवर मला पुष्कळसे छान, चवदार पदार्थ खायला मिळाले. पण सासेजच्या सळईचं सार शिकायची संधी काही मिळाली नाही. आम्ही अनेक दिवस नि रात्री समुद्रावर प्रवास करीत होतो. जहाज तर भयंकरच हले आणि भिजल्याखेरीज आमचा एकही दिवस गेला नाही. ज्या बंदराकडे जहाज निघालं होतं, त्या बंदरावर ते येताच मी ते जहाज सोडलं आणि थेट अगदी उत्तरेकडल्या एका प्रदेशात गेले. घरचा इवला ऊबदार कोपरा सोडून काही आश्रय घेण्यासारखी सुरक्षित जागा शोधत एखाद्या जहाजावर लपून, हजारो मैल दूर असलेल्या परप्रदेशात येऊन दाखल व्हायच ही एक आश्चर्य वाटण्याजोगीच गोष्ट आहे. तिथं बिनपायवाटांची देवदार व बर्चच्या झाडांची दाट अरण्यं होती. त्यांचा इतका उग्र वास येत होता की मी लगेच शिंकले देखील नि लगेच मला सॉसेजची



आठवण आली. त्या अरण्यात अनेक सरोवरं होती आणि दुरून ती शाईसारखी काळी दिसत. त्यावर मोठाले राजहंस पोहत होते आणि मला पहिल्यांदा तर वाटलं की प्रचंड शुभ्र फेसच तिथं गोळा झाला असावा – इतके ते राजहंस स्तब्ध होते पाण्यावर. परंतु जेव्हा ते चालायला नि उडायला लागले तेव्हा ते कोण होते ते नीट कळलं मला. राजहंस म्हणजे गूज बदकांच्याच म्हणजे साध्या हंसाच्याच जातीचे असतात हो!–त्यांच्या चालीवरूनच ओळखता येतं ते. हो आपली जात कोणी लपवू शकतं थोडंच! मी देखील माझ्याच जातवाल्यांच्या बरोबर राहिले – रानातल्या नि शेतातल्या उंदरांच्या बरोबरच. बाकी मला ज्या साराची माहिती हवी होती नि ज्याच्यासाठी मी परदेशात प्रवास केला, त्याच्याबद्दल त्यांना माहिती दिसली नाही. सॉसेजच्या सळईचं सार होऊं शकतं ही कल्पनाच मुळी त्या उंदरांना इतकी अशक्य नि अतर्क्य वाटली की, सर्व अरण्यभर ज्याच्या त्याच्या तोंडी तेच वाक्य घोळत राहिलं! त्यांनी ठाम सांगितलं की ह्या साराची कृती मिळवण्याचा प्रश्न कधीच सुटणार नाही कारण हे सार अशक्य कोटीतलंच आहे! अर्थातच मला अंधुकशी देखील कल्पना नव्हती की नंतर त्याच दिवशी रात्री या साराच्या कृतीची मी पूर्व तयारी करू शकेन!

उन्हाळा मी म्हणत होता. त्या उंदरांच्या म्हणण्याप्रमाणे, त्या उन्हाळ्यामुळेच झाडीत खूप उग्र वास येत होता. काही वनस्पतींचा सुगंध दरवळत होता, नि पांढरे शुभ्र राजहंस पोहत असलेल्या त्या सरोवरांचा रंग निर्मळ पण काळपट दिसत होता. राईच्या किनाऱ्यालगतच्या तीन चार घरांच्या जवळ जहाजाच्या मुख्य शिडाइतका मोठा असा एक स्तंभ उभा केला होता. त्याच्या उंच टोकावर किती फडकत असलेल्या, सुंदर फुलांच्या माळा लोंबत होत्या. ग्रीष्म-स्तंभ होता तो. तरूण मुलांनी व मुलींनी त्याच्याभोवती नृत्य करून आपल्या गाण्यांनी, साथ देणाऱ्या व्हायोलिन वाद्यांनाही मागे टाकले होते. सूर्यास्ताच्या वेळी नि चांदरातीच्या वातावरणात धुंद होती ती मंडळी. पण त्यांच्या त्या आनंदात मी मात्र सहभागी होऊ शकले नाही. ग्रीष्मस्तंभाभोवतालच्या नृत्याशी माझ्यासारख्या छोट्या उंदराचा काय संबंध? तिथल्या मऊ शेवाळात माझ्या हातातली सळई घट्ट पकडून, मी आपली स्वस्थ बसून राहिले. एका विवक्षित ठिकाणी छानदार शेवाळ धरलेल्या एका झाडावर चंद्रकिरण भारी सुरेख पडले होते. ते शेवाळ आपल्या या उंदीरमहाराजांच्या केसाळ कातडीइतकंच सुरेख नि मऊमऊ होतं असं म्हणण्याचंही मी धाडस करीन. परंतु त्याचा शेवाळी रंग मात्र हिरवा होता. हा रंग डोळ्यांना चांगला असतो म्हणतात. एवढ्यात, एकदम, काही गोजिरवाणे छोटेछोटे लोक माझ्यावरच चाल करून येत असल्याचं मी पाहिलं! माझ्या गुडघ्याहून काही ते उंच नव्हते. परंतु दिसायला ते लोक माणसासारखे दिसत होते. जास्त रेखीव बांधा होता त्यांचा नि ते स्वतःला टिल्ले म्हणवीत.



त्यांचे कपडे नाजूक नि तलम होते आणि फुलांचे नि पानांचे बनवलेले होते. त्यांना बारीक बारीक पंखांची किनार लावली होती. त्यांच्या एकंदर हालचालीवरून ते काहीतरी शोधत असावेत असं वाटलं मला; काय शोधत होते कोणास ठाऊक! शेवटी एकानं माझ्याकडे न्याहाळून पाहिलं आणि तो माझ्या जवळ आला. जवळ येऊन माझ्या सळईकडेच त्यानं बोट दाखविलं. तो म्हणाला, "ते–ते तुमच्याजवळ असलेलंच आम्हांला हवं आहे, पहा त्याला वर टोक आहे–किती छान! नाही?" तो जितका माझ्या त्या सळईच्या दंड्याकडे पाही तितका जास्तच आनंदित होई! "मी तुला उसना देईन तो हवं तर.... पण कायम ठेवायला नाही हो." मी त्याला उत्तरादाखल म्हणाले.

"छे, मुळीच नाही ठेवणार आम्ही" त्या सगळ्यांनी एकदम मोठ्यांदा सांगितले. त्यांनी माझी सळई झटकन धरली आणि जिथं ते मऊ शेवाळ उगवलं होतं तिथं नाचतनाचतच गेले ते. तिथं त्यांनी ती सळई मध्यभागी उभी रोवली. त्यांना ग्रीष्म-स्तंभ हवा होता; आणि ही सळई अगदी खास त्यासाठीच बनवलीशी वाटली त्यांना. त्यांनी आपला तो ग्रीष्म-स्तंभ इतका सुरेख सजविला की अगदी डोळेच दिपावे! छोट्या छोट्या कोळ्यांनी आपले सोनेरी धागे विणले त्याभोवती आणि मग त्यावरून फड-फडत्या झिरमिरीत पट्ट्या सोडण्यात आल्या नि रेशमी ध्वज उभारण्यात आले. ते इतके सुंदर शुभ्र होते की त्या चंद्रप्रकाशात हिमासारखेच चमकत. नंतर त्यांनी फुलपाखरांच्या पंखांतून रंग उचलले, व त्या गोफाच्या शुभ्र पट्ट्यांवर

नि ध्वजावर इतक्या कौशल्याने शिंपडले की त्यावर हिरे नि सुरेख फुलेच जडवलीशी वाटावीत. माझी सासेज सळई मलाच ओळखता येईना! इतका छान ग्रीष्म-स्तंभ जगात इतरत्र मी कुठेच पाहिला नव्हता.

त्यानंतर टिड्यांचा एक भला मोठा ताफा आला तिथं. त्यांचे कपडे कमालीचेच सुंदर होते. त्यांनी मला त्यांच्या मेजवानीला बोलावलं. पण मला अंतरावरच राहावं लागलं त्या मेजवानीत; कारण त्यांच्यापुढे मी भलतीच अजस्र वाटत होते. नंतर त्यांची वाद्ये सुरू झाली. काचेच्या हजारो मंजुळ घुंगरांच्या आवाजासारखा होता त्या वाद्यांचा आवाज. इतका मोठा दूर फैलावणारा होता तो की मला प्रथम वाटलं तो राजहंसांचाच आवाज असावा. नंतर मला वाटलं की मी कोकिळांचा नि काळ्या मैनांचाच आवाज ऐकतेय. नंतर नंतर तर गाण्याच्या मधुर सुरांनी सारं अरण्यच भरून गेलं! मुलांचे आवाज ऐकू येऊ लागले! घुंगरांची छुमछुम, पांखरांचं गुंजन आणि सारेच





मधुर स्वर त्या टिल्लयांच्या ग्रीष्मस्तंभातूनच येतातसं वाटू लागलं! माझी सासेजची सळई स्वरमय बनून गेली! माझ्या डोळ्यातून आसवंच झरू लागली – पण ती आनंदाची होती. रात्र तर केव्हा संपली ते कळलंच नाही इतकी ती लहान वाटली. उन्हाळ्यात, आपल्याप्रमाणे तिथल्या रात्री मोठ्याही नसतात म्हणा. सकाळ उजाडताच पहाटवाऱ्याच्या मंदझुळकीनं अरण्यातल्या त्या सरोवराच्या काचेसारख्या नितळ पाण्यावर लहरी उठवल्या. आणि पाहाते तो, कोळयांच्या सोनेरी धाग्यांचे हार, आणि पूर्वी कधीही नजरेला पडलं नव्हतं असं इतर सारं काही जादूसारखं पटकन अदृश्य झालं!

सहा टिल्लयांनी माझी सळई मला परत आणून दिली. त्याच वेळी मला काही वस्तू हवी असल्यास त्यांच्याजवळ मागण्यासाठी त्यांनी मोठ्या आग्रहानं विचारलं मला. ते त्यांच्या शक्तीबाहेर नसल्यास, मला लगेच देणार होते ते. म्हणून, सासेजच्या सळईचं सार कसं करतात ते सांगण्यासाठी मोठ्या आर्जवानं मी त्यांना विनंती केली."

"**सार** कसं करतात?" टिल्लयांचा प्रमुख हसून म्हणाला. "आतांच तर पाहिलंत की तुम्ही! तुम्हांला तुमची सळई ओळखताही येईना! यालाच म्हणतात **सार**!"

ते स्वतःला फारच शहाणे समजत असावेत असं वाटलं मला. म्हणून मग, मी तिथपर्यंत का प्रवास केला, साराची कृती शोधणाऱ्याला इथं काय मिळण्याचं वचन दिलं गेलं आहे वगैरे वगैरे त्यांना नीट समजावून सांगितलं. इतक्या छानदार वस्तू ज्या मी तिथं पाहिल्या त्याचा आमच्या उंदीरमहाराजांना किंवा त्यांच्या बलाढ्य राजाला काही देखील उपयोग नाही हेही मी त्यांना सांगितलं."

नंतर एका टिल्लयानं आपलं एक बोट एका व्हायलेटच्या फुलात बुडवलं आणि तो मला म्हणाला, "हे पहा, तुझ्या सळईभर हा रस मी चोळतो. तू तुझ्या राजाच्या राजवाड्यात जाताच या सळईनं राजाला फक्त स्पर्श करायचा म्हणजे सळई व्हायलेटच्या फुलांनी गच्च भरून जाईल. तुझ्या घरी न्यायला काहीतरी खरोखरीच नाव घेण्यासारखं आणि त्याहूनही सरस असं आणखीदेखील देतोय मी तुला...."

परंतु ते आणखी काहीसे दिलेले नीट समजावून सांगण्याआधीच त्या उंदीर तरुणीने चुकून, आपली सळई उंदीरमहाराजांपुढे धरली. महाराजांचा तिला स्पर्श होताच व्हायलेट फुलांच्या सुंदर झुपक्यांनी भरून गेली ती सळई आणि सारीकडे त्या फुलांचा सुगंध दरवळला. परंतु तो सुगंध इतका उग्र वाटला त्या उंदीरमहाराजांना, की त्यांनी ताबडतोब धुरांड्याजवळच्या उंदरांना आपापल्या शेपट्या विस्तवात घालून त्या भाजण्याची आज्ञा केली! त्या भाजण्याच्या जळकट वासापेक्षा फुलांच्या सुगंधाचा घमघमाट जास्त त्रासदायक वाटत होता त्यांना! कोणताही सुगंध सगळ्यांना सारखाच आवडतो असे थोडेच आहे?

नंतर उंदीरमहाराज म्हणाले, "हं तर ते आणखी काही दिलंय असं जे म्हणाला होतात ते काय?"

"कां बरं? हे आणखी काही म्हणजे कल्पनेनंच हवी ती वस्तू मिळवणं. एखादी प्रत्यक्षात हवी असलेली वस्तू आपण कल्पनेनं आपल्या डोळ्यापुढं आणावी. आणि ती मिळाली असं समजावं म्हणजे प्रत्यक्ष मिळाल्याचा आनंद वाटू शकतो. आता पहा हं...." असे म्हणून तिने आपली सळई गोल गरगर फिरवली आणि लगेच तिच्यावरचे एकूण एक फूल दिसेनासे झाले. सळई खालीवर करीत ती म्हणाली, "त्या टिल्लयांनी सांगितलं होतं की व्हायलेटची फुलं प्रत्यक्ष पहाता येतात. हुंगता येतात नि त्यांना स्पर्श करता येतो. तसंच आता फक्त राहिलं आपल्याला हव्या





दुसऱ्या उंदीर तरुणीला काय सांगायचे होते—


असलेल्या वस्तूंचा आवाज ऐकणं आणि त्यांची चव चाखणं. त्याची कल्पना करता येते." असं म्हणून त्या उंदीर तरुणीने आपल्या सळ-ईने तऱ्हतऱ्हेचे आवाज काढायला सुरवात केली. प्रथम वाद्यांसारखे, मग तर थेट स्वैपाक-घरातल्या भांड्याच्या आवाजासारखे! तिने आपली सळई जोरजोराने ज्याच्यात्याच्यावर आपटायला नि गरगरवायला सुरवात केली. झाकण्यांसारखा, पळ्यांसारखा, कालथ्यासारखा, पाणी उकळल्यासारखा असे अनेक आवाज होऊ लागले तिथे. शेवटी तर इतके आवाज उठले की तिने ती सळई खाली टाकून दिली.

"भारी विचित्रच **सार** दिसतंय हे तर. तरी पण तुम्ही शिकलेल्या साराची संपूर्णकृती तर कळू द्या एकदा आता!" " उंदीरमहाराज गोंधळून म्हणाले....

"महाराज, ही एवढीच तर कृती! आता प्रत्यक्ष दाखवली तीच भांडी वाजवून सार तयार केल्याची कल्पना नाही का केली मी? लुटपुटुचं सार केलं की! अहो, बोलाचं सासेज, बोलाचंच सार, ते चाखल्याची कल्पना महाराजांनी करावी की झालं." उंदीर तरुणीने लवून उत्तर दिले.

"बस? हेच का तुमचं सार—?" महाराज म्हणाले. "बरं तर या दुसऱ्या बाईंना काय माहिती सांगायचीय ती तरी ऐकूं या आपण." त्यांनी वाक्य पूर्ण केले.

"माझा जन्म एका किल्ल्यातल्या पुस्तका-लयात झाला आहे. तिथं राहाणाऱ्या आमच्या कुटुंबातल्या फारच थोड्यांचं सद्भाग्य जेवण-घरापर्यंत पोचण्याइतकं होतं; आणि कोठार-घरापर्यंत जाण्याचं तर त्याहूनही थोडं! स्वैपाकघर कसं असतं ते तर केवळ माझ्या या प्रवासात नि आज या इथच, फक्त दिसलं मला. त्या पुस्तकालयात आम्हांला अनेकदा उपासमार काढावी लागे खरी, परंतु तिथं आम्हांला बरंच ज्ञान मिळवतां आलं. सॉसेजच्या सळईचं सार करण्याबद्दलच्या राजेसाहेबांच्या बक्षिसाची बातमी आमच्या कानी आली तेव्हाच माझ्या आजीनं एक जुनं हस्तलिखित शोधून बाहेर काढलं होतं. तिला वाचता येत नव्हतं पण त्यातून वाचलेलं तिनं ऐकलं होतं. त्यांत लिहिलं




होतं, 'जे कवी असतात ते सॉसेजसळईचं सार करू शकतात.' तिनं मग, मी कवी आहे का ते मला विचारलं. मी तर अशा बाबतीत साफच कोरी होते. तेव्हा ती म्हणाली की मी चार ठिकाणं हिंडून प्रथम कवी बनलं पाहिजे. कवी होण्यासाठी मी काय केलं पाहिजे हे मी तिला पुन्हा विचारलं. कारण सार करण्याइतकंच तेही कठिण वाटलं मला. माझ्या आजीनं, तिच्या काळात पुष्कळांना वाचताना ऐकलं होतं की त्यासाठी तीन मुख्य गोष्टी जरूर असतात. शहाणपणा, कल्पना आणि भावना. ती म्हणाली, 'या तीन गोष्टी जर तुझ्यात आल्या तर सॉसेजच्या सळईचं सार करणं तुला फारच सोपं जाईल.'

म्हणून मी जग प्रवासाला निघाले, आणि कवि होण्यासाठी पश्चिमेकडच्या देशात गेले. कारण प्रथम मला शहाणपणा मिळवायचा होता. इतर दोन गोष्टी तशा फार कठीण वाटल्या नाहीत. कुठे मिळणार शहाणपणा? एका महान ज्यू राजाने मला सांगितलं, 'मुंग्यांच्याकडे जाऊन त्यांच्याकडून तो शीक' पुस्तकालयात राहून मलाही ते ठाऊक होतं. म्हणून मी सरळ जी निघाले ती नजरेस पडणाऱ्या मुंग्यांच्या पहिल्याच वारुळाशी थांबले. मग मी शहाणपणा मिळवण्यासाठी त्यांचं निरीक्षण करायला सुरवात केली. मुंग्या या अत्यंत आदरणीय प्राणी आहेत—मूर्तिमंत शहाणपणाच! त्यांचं सारं काम एखाद्या गणितातल्या उदाहरणाप्रमाणे अशा तऱ्हेचं असतं की ज्याचं उत्तर बरोबर यायलाच हवं. काम करायचं, अंडीं घालायची, पुढल्या पिढीसाठी व्यवस्था करायची, म्हणजे आपल्या जीवनाचा काळ अगदी व्यवस्थितपणे घालवायचा, हे मुंग्या अगदी बिनचूक करतात. स्वच्छ मुंग्या आणि घाणेरड्या मुंग्या असे त्यांचे भाग आहेत. त्यांचे क्रमांक अंकांनी दाखविलेले असतात आणि राणी मुंगीचा क्रमांक नेहमी पहिला असतो. प्रत्येक गोष्टीत तिचं मत हेच योग्य मत समजलं जातं.

साऱ्या जगातला शहाणपणा तिच्या एकटी-जवळच साठलेला असतो आणि तोच मला मिळवायचा होता. तिनं मला पुष्कळशी माहिती सांगितली. तिला ती फार महत्त्वाची वाटत होती, पण मला मात्र ती अर्थशून्य वाटली. ती म्हणत होती की त्यांचं वारुळ हीच जगातली एक अत्यंत उंच वस्तू! वास्तविक शेजारच्याच टेकाडावर एक खूप उंच वृक्ष वाढलेला होता. तो जास्त उंच असल्याबद्दल—खूपच जास्त उंच असल्याबद्दल कुठेच दुमत झालं नसतं. परंतु त्याचा उल्लेखही केला नाही राणी मुंगीनं! एक दिवस एक मुंगी त्या वृक्षाच्या बुंधावर इतर मुंग्यांहून उंच चढली. अर्थात शेंड्यापर्यंत नाहीच. नंतर ती परत येऊन इतर मुंग्याना म्हणाली की तिच्या त्या प्रवासात वारुळाहून अधिक उंचीची वस्तू तिनं पाहिली. ते ऐकून इतर मुंग्याना तो त्यांच्या सबंध जातीचा अपमान वाटला. म्हणून त्यांनी तिला स्वतःचं तोंड बांधून घेऊन एकांतात राहाण्याची शिक्षा दिली. काही वेळानं दुसऱ्या एका मुंगीनं तसाच प्रवास करून तोच शोध पुन्हा जाहीर केला. परंतु ती फार जपून नि मोघम बोलली. ती अधिक बऱ्या मुंग्यांपैकी नि पुष्कळ मान असलेली मुंगी असल्यामुळे इतरांनी तिच्या म्हणण्यावर म्हणजे शोधावर विश्वास ठेवला. पुढे अशी संशोधक वारल्यामुळे तिचे स्मारक उभारून त्या स्मारकावर त्या बाकीच्या मुंग्यांनी अंड्यांचं टरफल उभं केलं. कारण त्यांना शास्त्रांबद्दल व त्यांच्या संशोधकाबद्दल आदर वाटे."

छोटी उंदीर तरुणी म्हणाली, "मी असं पाहिलं की मुंग्या आपल्या पाठीवर ओझं घेऊन सारख्या इकडून तिकडे जात असतात. एकदा एकीचं ओझं खाली पडलं. काही केल्या तिला



ते पुन्हा उचलता येईना. तेव्हा दोन मुंग्या तिथं आल्या नि त्यांनी ते ओझं उचलण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांची स्वतःची ओझी खाली पडली! त्या थोडा वेळ थांबल्या. त्यांनी स्वतःचं काम आधी केलं, हो स्वतःच्या कामाचा विचार आधी नको का करायला? राणीमुंगीनं लगेच म्हटलं की त्यात त्या मुंग्यांनी दयार्द्र दृष्टी दाखवली नि शिवाय शहाणपणाही दाखवला. शिवाय या दोन गुणांमुळेच मुंग्यांना इतर कोणत्याही समंजस प्राण्याच्यापेक्षा या जगात सर्वांत जास्त वरचे मानाचे स्थान मिळाले आहे. समजूतदारपणा हा मुंग्यांच्या जातीचा महत्त्वाचा गुण आहे आणि त्यांच्यातल्या शहाणपणाला तर सर्वांत जास्त महत्त्वाचं स्थान आहे."


असं म्हणून राणीमुंगी आपल्या मागच्या पायांवर ताठ उभी राहिली. लोक चुकून इतर कोणालातरी राणीमुंगी म्हणतील की काय अशी शंका वाटली तिला. म्हणून मीहि चुकले नाही आणि नेमकं त्या राणीमुंगीला मी खाऊन टाकलं. मुंग्यांजवळून शहाणपणा मिळवायचा होता मला—आणि मी तर तिच्या शहाणपणासकट ती राणीच मिळवली माझ्या पोटात.

त्यानंतर मी त्या मघाशी सांगितलेल्या टेकाडावरच्या उंच वृक्षाजवळ गेले. तो ओकवृक्ष होता नि फार जुना होता. त्याचा बुंधा पुष्कळ उंच होता आणि फांद्यांचा विस्तार तर खूपच फैलावला होता. मला हेही ठाऊक होते की त्या वृक्षाबरोबरच एक वनदेवता (ड्रायाड) देखील जन्माला आली होती. मी त्या वनदेवतेजवळ जाऊ लागले. परंतु बायकांच्या सवयीप्रमाणे ती सुरवातीला मला पाहाताच घाबरून एकदम ओरडली. तिला विशेषतः उंदरांची भारीच भीती वाटे. शिवाय ती अशासाठी घाबरली की ज्या वृक्षावर तिचं जीवन अवलंबून होतं तेच कुरतडून टाकायला मी त्याच्याजवळ जात नसेन कशावरून. परंतु मी तिच्याशी अतिशय प्रेमानं नि आपुलकीनं बोलले नि 'मुळीच भिऊ नकोस' म्हणून सांगितलं. मग तिनं आपल्या नाजूक हातांनी मला धरलं आणि मीही माझ्या अशा भटकण्याचं कारण तिला सांगितलं. तिनं मला लगेच



आश्वासन दिलं की मला हव्या असलेल्या कल्पना आणि भावना या दोन उरलेल्या गोष्टी त्याच संध्याकाळी मिळू शकतील. ती म्हणाली की फँटस्थस नांवाचा तिचा एक मित्र होता— प्रत्यक्ष मदनाइतका देखणा! त्या वृक्षाच्या गर्द हिरव्या छायेखाली तो रोज अनेक तास तिच्याशी गप्पा मारीत बसे. त्यावेळी त्या वृक्षाच्या फांद्या डौलात जास्तच सळसळत नि हेलकावे खात. फँटस्थसला ती वनदेवता व तो पोखरलेल्या ढोलीचा जुना वृक्ष फार आवडे. जमिनीत खोलवर रुतलेल्या त्या वृक्षाच्या मुळ्या व मोकळ्या ताज्या हवेत उंच गेलेले त्याचे शेंडे यांनी हिमवर्षाव, झोंबरे वारे आणि ऊबदार सूर्यप्रकाश ही अनेक वर्षे पाहिली होती. ती वनदेवता मला पुढे म्हणाली, "त्या ओकच्या फांद्यांमध्ये पाखरं सतत गाणी गात असतात नि परप्रदेशात पाहिलेल्या शेतांबद्दल चर्चा करीत असतात. त्या ओकच्या एका जीर्ण डहाळीवर एका करकोचाने एक घरटेही बांधलेले आहे. फारच सुरेख रचना आहे म्हणे त्याची. तो करकोचा नेहमी आपल्या पिरॅमिडवाल्या देशाच्या मनोरंजक गोष्टी नेहमी सांगत असतो आम्हांला.

फँटस्थसला तर त्या सर्व गोष्टी भारी आवडतात, पण तेवढ्यानंच त्याचं समाधान होत नाही. मला माझ्या, या रानातल्या नित्य-क्रमाविषयी त्याच्याशी सारख्या गप्पा माराव्या लागतात. जेव्हा मी अगदी चिमुकली होते नि हा वृक्ष देखील खाजकुइलीच्या झुडुपाहूनही छोटसं, अगदी एवढसं रोप होतं, त्या वेळच्या म्हणजे माझ्या बाळपणीच्या गमती सांगाव्या लागतात. त्यावेळेपासून तो अगदी आज-तागायत, जेव्हा तो वृक्ष इतका मोठा नि भव्य झाला आहे, तिथपर्यंतच्या घडलेल्या सर्व हकीकती मला सांगाव्या लागतात. म्हणून म्हणते नीट ऐक मी काय सांगते ते. त्या हिरव्या झाडावर थोडा वेळ बसून नीट लक्ष दे जरा. फँटस्थस जेव्हा येईल तेव्हा गप्पा मारताना त्याच्या पंखावर हात ठेवण्याची मी संधी साधेन




आणि मग हळूच त्यातलं एक चिमुकलं पीस काढेन. ते पीस मी तुला देईन. इतकं छान की त्याहून चांगलं पीस आजपर्यंत एकाही कवीला मी कधी दिलं नसेन."

"फँटस्थस जेव्हा आला तेव्हा मग त्याच्या पंखाचं एक पीस काढण्यात आलं; आणि नंतर मी ते घेऊन पाण्यात टाकलं—" ती उंदीरतरुणी म्हणाली. "पाण्यात अगदी मऊ पडेपर्यंत ठेवलं मी ते. ते पचायला भारी जड नि त्रासदायक असलं तरी मी ते तसंच पार

शेवटच्या टोकापर्यंत चघळलं. असे चघळण्याचे कष्ट सोसून कवी होणं ही सोपी गोष्ट नाही, केवढ्या यातना असतात त्यात. पण त्यामुळे आतापर्यंत माझ्यात दोन गुण आले होते; शहाणपणा नि कल्पना. आता या दोहोंच्या मदतीनं तिसरा गुण आमच्या ग्रंथालयातच सापडणार होता. कोण्यातरी मोठ्या माणसानं असं म्हटलं नि लिहिलं आहे की, अशा काही कादंबऱ्या आहेत की ज्यांचं एकमेव कार्य म्हणजे मानवाला त्याच्या ओसंडून वाहणाऱ्या दुःखाश्रूंतून सोडवणं. म्हणजेच त्यांच्या भावना नि मनोगत स्पंजासारखं आपल्यात शोषून घेणं. मला ह्यातली काही पुस्तकं चांगली आठवतात. भूक लागल्यावर खावीशी वाटायची ती. ती पुस्तकं पुष्कळांनी वाचली होती माझ्या आधी. इतकी तेलकट झाली होती की खात्रीनं असंख्य भावना त्यांनी आपल्यात सामावल्या असाव्यात.

मी परत वाचनालयाकडे माघारी वळले आणि अक्षरशः एक सबंध कादंबरी मी खाल्ली म्हणजे आतले मऊ कागद खाल्ले. कडक भाग नि पुठ्ठा मात्र टाकून दिला. हे पुस्तक नि आणखी दुसरं एक पचल्यावर माझ्यात बदल होतोयसं वाटलं मला. मग मी आणखी एक तिसरी कादंबरी खाल्ली नि ताबडतोब, मी कवी बनल्याची खात्री पटली मला. मी स्वतः-शीही बोलले तसं नि इतरानाही सांगितलं. एकाएकी असा बदल झाल्यानं माझं डोकं दुखू लागलं, पाठ दुखू लागली, आणि काय काय दुखू लागलं ते सांगताच येत नाही. नंतर सॉसेजशी संबंध असलेल्या सर्व कथांबद्दल खूप विचार करू लागले मी—ज्यांत सळ्या, काड्या, शिगा, कपच्या वगैरे वगैरे असतील अशा सर्व कथा माझ्या डोळ्यापुढे उभ्या राहिल्या.

सळ्या, शिगा, लाकडी काड्या या सर्वांचा मी कवीच्या दृष्टीने विचार केला आहे. मी इतक्या मेहनतीनं कवी बनल्यामुळं आता मी कशावरही कविता पण करू शकेन. म्हणून महाराज, आठवड्यातील सारे दिवस आपल्या खिदमतींत राहून सळईच्या सारातली कवि-कल्पना मी आपणास खचित समजावून सांगत जाईन आणि हेच माझं सळईचं सार!"



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
विभाग
क्रमांक
नोंद दिनांक


२५



"हं; ठीक आहे. आता या तिसऱ्या उंदीर तरुणीला काय सांगायचं आहे ते आपण ऐकू." उंदीरमहाराज म्हणाले.

"स्कीक-स्कीक—" तेवढ्यात एक छोटा उंदीर स्वैंपाकघराच्या दाराशी ओरडला. बक्षिसाच्या त्या चार उमेदवार तरुणींपैकी चौथी उंदीर तरुणी होती ती. तिचा क्रमांकही तिसरा नसून चौथा होता. ज्याअर्थी ती इतरांबरोबर वेळेवर आली नव्हती त्याअर्थी ती कुठेतरी दगावली असावी असेच आतांपर्यंत सर्वांना वाटले होते. परंतु ती अचानक एखाद्या तीरासारखी आत शिरली आणि तिच्या नावाने क्रेपकागदात गुंडाळून रोवलेली ती सळई तिने कोलमडून टाकली. तिथे येऊन पोहोचण्यासाठी रात्रंदिवस धावत होती ती सतत. वेळेवर येता यावे म्हणून अखेर एका मालगाडीच्या डब्यात शिरण्याची संधी साधून— ती आगगाडीने आली मुद्दाम! तरी देखील खूपच उशीर लागला तिला तिथे यायला. स्वैंपाकघरातल्या सभेत गर्दीतून रेटत ती पुढेपर्यंत आली—भारी गोंधळलेली दिसत होती ती. तिची सळई तिने हरवली होती पण तिचा आवाज तसाच खणखणीत शाबूत होता. आणि तिथं येऊन उभे राहाताक्षणीच कशाचीही वाट न पाहाता तिने आपल्या भाषणाला एकदम सुरुवात केली. जणू ती सभेतली मंडळी तिचीच वाट पाहात होती नि तिच्यासाठीच खोळंबून राहिली होती! जसे काही फक्त तिचेच भाषण ऐकायचे होते त्या मंडळींना.

तिने इतक्या स्पष्ट नि अस्खलितपणे मारे आवेशात आपले भाषण सुरू केले नि इतक्या अचानकपणे ती तिथे प्रकट झाली होती की, इतरांना तिला थांबवायला नि तिच्या आधी तिसऱ्या क्रमांकाचे भाषण झाले पाहिजे हे सांगायला अवसरच मिळाला नाही! तेव्हा तिने काय भाषण केले तेच ऐकू या आता आपण.



**तिसऱ्या उंदीर-तरुणीच्या आधीच बोलणाऱ्या या चौथ्या तरुणीला काय सांगायचे होते.**

ती म्हणाली, "मी तावडतोब एका मोठ्यातल्या मोठ्या गावी जायला निघाले. आता विसरले म्हणा मी त्या गावाचे नाव. माझ्या बाई, नाव नाही कधी लक्षात रहात. हं. तर काय की मी एका आगगाडीतून गेले. ती आगगाडी एका तुरुंगाच्या गावी जप्त केलेला माल घेऊन जात होती. गावाला पोहोचताच मी गाडीतून सटकले अन् एका घरात शिरले. तुरुंगाच्या किल्ल्या बाळगणाऱ्या अधिकाऱ्याचे घर होते ते. तो अधिकारी कैद्यांबद्दल बोलत होता – विशेषतः जे कैदी बेजबाबदारपणे बडबडत त्यांच्याबद्दल. शब्दांतून शब्द निघाले नि सरते शेवटी शिक्क्यानिशी लिहून ठेवण्यात आले. शब्द होते, "सरते शेवटी हे सर्व प्रकरण म्हणजे, 'सॉसेजच्या सळईचे सार बनवत बसण्यासारखेच आहे, पण ह्या असल्या सारानें त्याची गर्दनच उडेल म्हणावं." तो अधिकारी लिहीत होता.


यामुळे मला त्या कैद्याबद्दल कुतूहल उत्पन्न झाले. म्हणून संधी मिळताच मी त्याच्या कोठडीत घुसले; कारण तिथे दरेक दाराशी एक उंदराचे बीळ होते. कैदी पांढरा फट्ट पडला होता, त्याला दाढी होती आणि त्याचे डोळे चमकदार होते.

तिथं दिवा जळत होता, पण भिंती इतक्या काळ्या होत्या की त्या जास्तच काळ्या भासत. त्या कैद्याने पांढऱ्या खडूने त्या भिंतीवर कविता लिहिल्या होत्या नि चित्रे काढली होती. मी त्या कविता काही वाचल्या नाहीत म्हणा. त्या कैद्याला तिथं जखडून राहाणं कंटाळवाणं वाटत असावं म्हणून मी त्याला अगदी उचित पाहुणी वाटले. त्यानं मला गोड शब्दांनी, शिळा घालून नि पावाचे तुकडे देऊन आपलंसं केलं. त्यानं इतकी मैत्री केली माझ्याशी की मला त्याची भीती वाटेनाशी झाली आणि आम्ही अगदी दोस्त बनलो. तो आपल्या पावात नि पाण्यात माझी वाटणी काढी. मला चीज नि सॉसेज देई. मला तो कैदी त्यामुळे फार आवडू लागला. एकंदरीत, आमची मैत्री फारच छान ठरली. तो मला त्याच्या हातावर,



खांद्यावर नि शर्टाच्या बाह्यांतूनही हिंडू देई. मी त्याच्या दाढीतही शिरायची. तो मला त्याची छोटी दोस्त म्हणायचा. या साऱ्यामुळे जमिनीच्या एका भेगेत ठेवलेली माझी सासेजची सळई मी तिथं तशीच विसरले. अजूनही तिथं ती तशीच असेल. मला तर नेहमीच त्याच्याजवळ तिथं राहावंसं वाटलं. कारण मला ठाऊक होतं की मी जर तिथं नसले तर बिचाऱ्या त्या कैद्याला कोणीच जिवाभावाचा मित्र राहाणार नाही. किती वाईट वाटण्याजोगी गोष्ट! म्हणून मी तिथंच राहिले. पण नंतर तोच राहिला नाही. त्याच्या जाण्याच्या दिवशी तर नेहमीपेक्षा दुप्पट चीज नि पाव दिला त्यानं मला. त्यानं मला गोंजारलं व नंतर तो जो निघून गेला तो पुन्हा कधीच परत आला नाही. त्याची पुढं काहीच बातमी नाही.

तुरुंगाधिकाऱ्यानं माझा ताबा घेतला. सळईच्या साराबद्दलही तो काहीस बोलला होता,



परंतु माझा त्याच्यावर विश्वास नव्हता. त्यानं मला आपल्या हातात घेतलं खरं पण ते केवळ मला एका पिंजऱ्यात ठेवायला. बाई ग! केवढा भयंकर वाटत होता तो पिंजरा! त्यात सारखी मी गोलगोल फिरत राहिले तरी पुढची वाट कुठं मिळेना! सगळ्यांना मोठमोठ्यानं हंसायला विषय मात्र झाला तो! त्या तुरुंगाधिकाऱ्याची छोटीशी नात भारी गोड होती. चकमकीत सोन्यासारखे तिचे कुरळे केस होते; डोळे आनंदी होते नि जिवणी हसरी होती.

एक दिवस माझ्या पिंजऱ्यात डोकावताना ती मला म्हणाली, “बिचारा माझा पिटुकला उंदीर! थांब तुला सोडून देते मी हं.” तिनं लगेच लोखंडी खिटी पुढे ओढली नि मी एकदम ताडकन त्या पिंजऱ्याबाहेर उडी मारली – थेट खिडकीच्या दारावरच्या फळीवर – आणि तिथून सरळ छपरावर!

मुक्त! मुक्त!—फक्त एवढाच विचार करू शकले मी – माझ्या प्रवासाचा हेतू आठवेचना मला!






काळोख पडला, रात्र होऊ लागली तशी मला एका जुन्या मनोऱ्यात आश्रय मिळाला. तिथं मनोऱ्याचा रखवालदार नि एक घुबड राहात होते. माझा दोघांवरही मुळीच विश्वास नव्हता. त्या घुबडावर तर काडीइतकाही नव्हता. कारण त्याचा मांजरासारखाच स्वभाव असतो आणि त्याचा मोठा दोष म्हणजे त्याला उंदीर फार आवडतात.”

एखादेवेळी आपली कधी चूक देखील होते, तशीच माझी देखील झाली. कारण ही

घुबडी आदरणीय, सुशिक्षित नि वयोवृद्ध होती. त्या रखवालदाराहूनही तिला जास्त समजत होतं–अगदी माझ्याएवढं देखील. तिची छोटी पिलं उगाचच गडबड नि द्वाडपणा करीत. पण ती रागात त्यांना फक्त एवढंच म्हणे, "सासेजच्या सळईचं थोडं सार तरी करा त्यापेक्षा" आपल्या पिलांचे भारी लाड करी ती. तिच्या त्या स्वभावामुळे मला इतका विश्वास वाटला तिचा की, ज्या फटीत मी दडून बसले होते तिथून 'स्कीऽक' असा पटकन आवाज निघाला माझ्या तोंडून. या माझ्या विश्वासाने फार खूश झाली ती नि मला म्हणाली की तिच्या संरक्षणाखाली मला कोणीही इजा करू शकणार नाही. पण खरं कारण म्हणजे, मला हिवाळ्यात जेव्हा फारसं खाणं मिळत नाही, तेव्हा खाण्यासाठी राखून ठेवण्याचा दुष्ट हेतू तिच्या मनात असावा. मात्र ती भारी चलाख घुबडीण होती. तिनं मला जोरात समजावून सांगितलं की तो रखवालदार फक्त कंबरेला टांगलेलं शिंगच फुंकू शके. आणि तरीही त्याला त्याची भारी घमेंड वाटे की त्या मनोऱ्यात घुबडाएवढी मोठी पात्रता त्यालाच होती. त्याला वाटे, त्याला अगदी मोठाल्या गोष्टीही करता येतात. पण येत मात्र छोट्या गोष्टीच !—केवळ सासेजच्या सळईचं सार ! म्हणून मी त्या घुबडीला ते सार करण्याची कृती नि त्याचं साहित्य विचारलं. तेव्हा ती म्हणाली की, ती माणसांच्या जातीत नेहमी वापरण्यात येणारी एक म्हण आहे. अनेक अर्थांनी ते वापरतात ती. ती म्हण वापरणाऱ्या प्रत्येकाला वाटते की आपलाच अर्थ बरोबर पण खरं बोलायचं तर त्या म्हणीला काहीच अर्थ नाही."

"काहीच नाही?" मी आश्चर्याने विचारलं. थक्कच झाले मी. ती म्हणत होती, "खरं खरंच नाही. बोलणं फारसं कोणाला आवडत नाही, पण खऱ्याची सर कशालाच नाही!"

म्हणून मग मी घाईघाईने तिथून परतले. 'सत्य' ज्याची सर कशालाच नाही असा तो





## सार कसे तयार केले गेले—

सत्य अर्थ सांगायचा होता मला त्या म्हणीचा. तेव्हा महाराज, 'सॉसेजच्या सळईचं सार' या म्हणीला काही अर्थ नाही हे सत्य आहे. उंदरांची जात ही एक सुसंस्कृत जात असून आपण सत्य समजणारे असे त्यांत सर्वांत पुढे आहात. आणि हे सत्य सांगितल्याबद्दल आपण मला खात्रीनं राणी कराल."

इतक्यात आतापर्यंत न बोललेली–तिसऱ्या क्रमांकाची उंदीर तरुणी एकदम ओरडून म्हणाली, "तूं जे सत्य म्हणून सांगतेस ते साफ खोटं आहे, समजलीस? मला सार करता येतं आणि मी करूनच दाखवणार आहे."

तिसरी उंदीर तरुणी म्हणाली, "मी प्रवासच केला नाही. मी आपल्याच देशात राहिले आणि हेच योग्य होतं. प्रवासानं काही सुद्धा फायदा होत नाही. बसल्याजागी सर्व काही सहज मिळवता येतं. म्हणून मी घरीच राहिले. मी कोण्या काल्पनिक व्यक्तीकडून काही मिळवलं नाही. काही वस्तूही गिळली नाही की घुबडांशीही संभाषण केलं नाही. माझ्या स्वतःच्या कल्पनेनं नि विचारांनीच मी ते ज्ञान मिळवलं. तुम्ही आता सारासाठी विस्तवावर पाण्याची किटली उकळायला ठेवता का? हं– पाणी भरा तिच्यात—अगदी भरपूर–काठोकाठ भरेल इतकं! विस्तवावर ठेवा ती. चांगला जाळ लावा—धगधगीत! पाणी उकळेपर्यंत जाळ चालू ठेवा. अगदी खळखळ एक सारख्या उकळ्या फुटू द्या. हं हे पहा. मी सॉसेजच्या सळईचं सार करायला ही सळई टाकते आता त्या पाण्यात. आता उंदीरमहाराज, कृपा करून आपली शेपटी त्या उकळत्या पाण्यात बुडवतील का जरा? नि शेपटीनं ते पाणी नीट गोल ढवळतील का बरं? जितकं जास्त वेळ ते पाणी ढवळलं जाईल तितकं जास्त चवदार होईल ते सार. यापेक्षा आणखी काहीसुद्धा करायला नको– फक्त ते ढवळायचं एवढंच."


उंदीरमहाराज बिचकत म्हणाले, "इतर कोणी ढवळलं तर नाही का चालणार?" उंदीर




तरुणी म्हणाली, "नाही ना. फक्त उंदीरमहाराजांच्या शेपटीतच ती करामत आहे...."

पाणी उकळत होते नि बुडबुडे फुटत होते. उंदीरमहाराज किटलीच्याजवळ उभे होते. ही कृती संकटासारखीच होती नाही म्हणायला. परंतु महाराजांनी तोंड फिरवून आपली शेपटी सज्ज केली – एखाद्या गौळीवाड्यात, दुधाच्या भांड्यातल्या सायीत बुडवायच्या वेळी जशी करायची आणि मग ती चाटून घ्यायची – तशी सज्ज. परंतु उंदीरमहाराजांच्या शेपटीने त्या गरम वाफेला जरा स्पर्श केला न केला तोच उंदीरमहाराजांनी वरच्या धुरांड्यात, ताडकन जी उडी मारली! एकदम उद्गारले ते, "हो. खात्रीनं. नक्कीच! तुम्हीच माझी राणी होणार! आणि हा साराचा प्रश्न तर्त आपल्या लग्नाच्या सुवर्णदिनापर्यंत तहकूब! पुढच्या पन्नास वर्षांपर्यंत! माझ्या राज्यातल्या आजच्या गरीब प्रजेला तोपर्यंत भरपूर अन्न मिळेल आणि या पन्नास वर्षांनी येणाऱ्या साराची ती मोठ्या आनंदानं वाट पाहील."

नंतर लवकरच लग्नसमारंभ पार पडला. समारंभाहून परतणारी बरीच मंडळी मात्र म्हणत होती, "**सॉसेजच्या सळईचं** म्हणण्यापेक्षा त्याला उंदराच्या शेपटीचं सार हे नाव जास्त योग्य झालं असतं."





# किराणेवाल्याचा टिल्ल्या वेताळ

एकदा एक होता विद्यार्थी. पुस्तकात डोके खुपसून खूप अभ्यास करणारा खराखुरा विद्यार्थी. तो एका घराच्या पोटमाळ्यावर राहायचा. विद्यार्थी इतका गरीब होता की त्याच्या मालकीची म्हणण्यासारखी एकसुद्धा वस्तू नव्हती त्याच्याजवळ.

त्याच घरात एक किराणामालाचा दुकानदारदेखील राहायचा. तो तर अट्टल वाणी होता. त्याच घराच्या तळमजल्यावर त्याचे बिऱ्हाड आणि दुकान होते. ते सबंध घरच त्या किराणेवाल्याच्या मालकीचे होते. त्या दुकानदाराकडे एक छोटा वेताळ राहायचा

तो टिल्लया वेताळ तिथे अगदी आरामात राही. कारण दर नाताळात तो दुकानदार त्याला एक भला मोठा वाडगाभरून लापशी आणि त्यावर भला मोठा लोण्याचा गोळा असा नैवेद्य वाढायचा. त्या किराणेवाल्याला ते वाढणे सहज परवडत असे. टिल्लया वेताळ दुकानाकडच्या भागात राहायचा कारण आले गेले गिऱ्हाईकही त्याला पाहायला मिळे, शिवाय खाण्यापिण्याच्या दृष्टीनेही ते त्याला फायदेशीर पडे.

एक दिवस विद्यार्थी पाठीमागच्या दाराने त्या दुकानात आला. त्याला काही मेणबत्त्या नि थोडे चीज हवे होते. त्या वस्तू घेऊन त्याने पैसे चुकते केले. दुकानदाराने आणि त्याच्या बायकोने त्याच्याकडे पाहून 'कसं काय ठीक?' या भावनेने प्रेमाने मान डोलावली. नमस्कार केला. आता त्या दुकानदाराच्या बायकोला देवाने एक फार मोठी देणगी दिली होती. ती म्हणजे अघळपघळ भरपूर बडबडण्याची देणगी. दोघांनीही त्याला नमस्कार करताच विद्यार्थ्यानेही हसून उलट नमस्कार केला आणि तो जायला वळला. वळताना अचानक त्याची नजर त्याच्या हातातल्या, चीज गुंडाळलेल्या कागदावर खिळली. तो विद्यार्थी तसाच उभा राहून तो कागद वाचण्यात गढून गेला पार! तो कागद म्हणजे कुठल्याशा एका जुन्या पुस्तकाचे एक फाटके पान होते. वास्तविक ती पाने तशी फाडायला नको होती कारण एक जुना पण अत्यंत दुर्मिळ असा काव्यसंग्रह होता तो!

"आणखी पुष्कळ पानं आहेत त्यातली माझ्याकडे. हवीत तुम्हांला?" तो दुकानदार म्हणाला. एका म्हातारीकडून घेतलं मी ते जुनं पुस्तक. त्याच्या बदली तिला थोड्या कॉफीच्या बिया द्याव्या होत्या. आठ शिलिंगांना पाहिजे तर ते सगळंच्यासगळं पुस्तक देतो तुम्हांला" ....किराणेवाल्याने बोलणे पूर्ण केले.

विद्यार्थी म्हणाला, "पुस्तक दिलंत तर आभारच मानीन मी. तुम्ही असं करा. ह्या चीजचा तुकडा नको मला. तो घ्या परत नि त्याच्याऐवजी पुस्तक देऊन टाका ते. माझं काय! मला नुस्ता पाव नि थोडं लोणी एवढंच जेवायला असलं तरी पुरतं. पण हे एवढं लाखमोलाचं पुस्तक असं फाडून त्याची पानं इकडे तिकडे जाऊ देणं हे एक तऱ्हेचं पापच!" पुढे जरा थांबून तो हसत म्हणाला, "दुकानदारदादा, तुम्ही फार भले नि व्यवहारचतुर माणूस आहात यात वाद नाही. पण या पुस्तकातल्या काव्याचं मोल तुम्हांला काय कळणार कपाळ? याची नि त्या तुमच्या त्या कोपऱ्यातल्या रद्दीच्या पिंपाची किंमत तुम्हांला सारखीच. खरं की नाही?"

एखाद्या परक्याला विद्यार्थ्याचे हे बोलणे जरा उद्धटपणाचे वाटले असते पण तो ते गमतीने बोलत होता हे त्या दुकानदाराला ठाऊक होते. दुकानदार मोठ्यांदा हसला आणि तो विद्यार्थीदेखील हसू लागला. कोपऱ्यात कोणालाही न दिसेसा बसलेला तो टिल्ल्या वेताळ मात्र एकदम रागावला विद्यार्थ्यावर. "हँ! ही काय बोलायची रीत? दुकानदारासारख्याला हे असं बोलायचं? वास्तवीक किती चोख वजन नि किती चोख माल देतो तो गिऱ्हाइकांना! छॅट्!...."



रात्र होताच दुकानदार दुकान बंद करून आतल्या खोलीतल्या आपल्या घरात गेला. नंतर सगळीकडे लोक आपापले जेवणखाण आटपून झोपले सुद्धा. फक्त विद्यार्थी मात्र आपल्या पोटमाळ्याच्या खोलीत एकटाच जागा होता. दुकानदाराच्या बायकोला झोप लागताच टिल्ल्यावेताळाने तिची जीभ हळूच चोरली! नाहीतरी तिला झोपेत त्या जिभेची काहीच गरज नव्हती. वेताळाने एकेका वस्तू-वर ती जीभ जरा टेकली रे टेकली की ती प्रत्येक वस्तू धडधडा बडबडत सुटे! केवळ वायफळ बडबडत नसे ती. त्या दुकानदारणी-प्रमाणेच आपले विचार, आपल्याला वाटणारं सगळं काही भराभर सांगू लागत त्या वस्तू.

सुदैवाने, ज्या एका वस्तूवर ती जीभ ठेवली जाई तेवढीच वस्तू फक्त बडबड करीत राही. नाहीतर जर का सगळ्याच वस्तू अशा एकाच वेळी बोलू लागल्या असत्या तर त्या दुकानात आरडाओरडा नि एक अजबच गिल्ला झाला असता. त्या वेताळाने ती जीभ त्या रद्दीच्या पिंपावर ठेवली, कारण त्याच पिंपाबद्दल तो विद्यार्थी बोलला होता. त्या पिंपात सगळी जुनी वर्तमानपत्रे भरली होती. वेताळाने त्या पिंपाला विचारले, "कायरे, खरंच का हे की काव्य म्हणजे काय ते तुला मुळीसुद्धा कळत नाही?"



"काय म्हणतोस? मला काव्य कळत नाही! वर्तमानपत्रात जागा भरायला जो फालतू मजकूर घालतात तेच काव्य! यात कळायचंय काय? या दुकानातलं एक जुनं पिंप असलो मी, तरी त्या कुचकामी विद्यार्थ्या-पेक्षा मला काव्याची जास्ती माहिती आहे. ही काय एवढी वर्तमानपत्रं!–त्यांत वाटेल तेवढं काव्य! नि सारं वाचून झालंय ते माझं...." ते पिंप आणखीही वडवडले असते पण वेताळाने ती जीभ कॉफीची भुकी करण्याच्या तिथल्या यंत्रावर ठेवली तितक्यात. किती खमंग वास येई ते यंत्र वडवत होते तेव्हा. वेताळाने ती जीभ मग तिजोरीवर ठेवली; आणि नंतर इतर किरकोळ किराणा जिनसांवर. काय काय एकजण बोलले पण! कमालच! त्या वेताळाने सर्वांना एकच प्रश्न विचाराला, आणि बहुतेक सर्वांनी त्या पिंपाप्रमाणेच उत्तर दिले. सगळ्यांचे झाडून एकमत होते की त्या सगळ्यांनाच काव्याची जास्त माहिती होती.

"पण आता त्या विद्यार्थ्याचं काय?" वेताळाला वाटले. विद्यार्थ्याची आठवण होताच लगबगीने ती जीभ पिंपावर तशीच टाकून वेताळ चोरपावलांनी मागच्या जिन्यावरून थेट पोटमाळ्यावर गेला! विद्यार्थ्याच्या खोलीचे दार बंद होते. वेताळाने चावीच्या भोकाला हलकेच डोळा लावून विद्यार्थी आत काय करतोय ते पाहिले. नव्यानेच सापडलेले ते लाख मोलाचे पुस्तक वाचण्यात विद्यार्थी तन्मय झाला होता!

अहाहा! किती देदिप्यमान ते सारे! वेताळाला त्या पुस्तकातून अचानक एक सूर्यकिरण झळझळत पसरताना दिसला. त्यातून एक मोठा डेरेदार वृक्ष उभा राहिला. त्या वृक्षाने आपल्या रुंद, नि लांबलांब फांद्या त्या विद्यार्थ्याच्या डोक्यावर सावलीसाठी फैलावल्या. वृक्षाचे प्रत्येक पान हिरवेगार नि टवटवीत होते. दरेक मोहक फुलातून छोट्याशा लोभसवाण्या मुलाचा चेहरा डोकावतोसा वाटला वेताळाला. काळेभोर नि तेजस्वी डोळे होते त्या मुलांचे आणि त्यांच्या मस्तकाभोवती शांत निळसर प्रकाशाची वलये होती—ती मुले म्हणजे जसे चिमुकले देवदूतच! त्या वृक्षाचे प्रत्येक फळ म्हणजे एकेक चकचकीत ताराच जसा! वृक्षाभोवतालच्या मनोहर वातावरणात अत्यंत मधुर नि आगळ्या संगीताच्या मंद लहरी घुमू लागल्या तेवढ्यात.

इतका सुंदर नि नवलाईचा देखावा त्या वेताळाने स्वप्नातही कधी पाहिला नव्हता. पाय उंच करकरून त्या भोकातून टक लावून पाहात होता तो आत. थेट तो विद्यार्थी आपल्या उशाचा दिवा मालवून झोपेपर्यंत अन् तो प्रकाशकिरण नाहीसा होईपर्यंत वेताळ अगदी भारल्यागत आत पाहात होता.



नंतरही वेताळाचा पाय तिथून निघेना. कारण संगीताचे ते मधुर ध्वनी त्या विद्यार्थ्याच्या अंगावर झोपेचा शेला पांघरीत अजूनही तिथेच रेंगाळत होते. टिल्ल्या वेताळ आश्चर्याने थक्क होत म्हणाला, "ही तर अजबच गोष्ट! याची मला कधी कल्पनाच नव्हती! मला वाटतं यांपुढे मी पैसे मोजणाऱ्या त्या किराणेवाल्यापेक्षा काव्यात गुंग होणाऱ्या या विद्यार्थ्याकडेच राहावं. परंतु?—च् च् च्! बिचारा गरीब विद्यार्थी! हंऽऽ! मला लापशी नि लोणी कुठून देणार तो?"



किराणेवाल्याची आठवण होताच टिल्लया वेताळ दुकानाकडे धावला, बरे झाले तो तसा धावला, कारण, विसरून ती जीभ त्या पिंपावर तशीच टाकली होती त्याने. इकडे त्याच्या गैरहजेरीत पिंपाने एकाच कंटाळवाण्या सुरात सगळ्या वर्तमानपत्रांतला सगळा मजकूर धडघडा वाचून टाकला! बडबडून बडबडून ती जीभ लुली करून टाकली पार. बरे झाले तेवढ्यात वेताळ परत आला म्हणून नाहीतर ते पिंप तो सारा मजकूर पुन्हा एकदा बडबडणार होते!

वेताळाने पटकन ती जीभ उचलली आणि दुकानदारणीच्या तोंडात जशीच्या तशी नेऊन ठेवली. आतापासून मात्र थेट तिजोरी ते सगळ्या किरकोळ जिनसांपर्यंत सगळ्यांना त्या पिंपाबद्दल भलताच आदर वाटू लागला — जणू ज्ञानाचे भांडारच ते! नंतर संध्याकाळी जेव्हा किराणेवाला 'टाईम्स'-मधील 'कला व नाट्या'वरची परीक्षणे वाचू लागला तेव्हा सगळे स्वतःशी म्हणाले, "हात्तेच्या! पिंपानं काल रात्री वाचलेलंच तर वाचतोय हा परत!"

टिल्लया वेताळाला बाकी त्यानंतर एकही रात्र चैन पडेना. पोटमाळ्यावर दिवा मिणमिणताना दिसला रे दिसला की हा हळूच जिना चढून तिथे पोहोचे. त्या मिणमिणत्या दिव्याचे इवले प्रकाशकिरण एखाद्या जहाजाच्या नांगराला बांधलेल्या दोरासारखे त्या वेताळाला खेचून तिथे आणीत. रोज त्या चावीच्या भोकातून आत दिसणारा देखावा पाहून आगळाच आनंद होई वेताळाला. त्याचे हृदय फुलून येई आनंदाने. सोनेरी उन्हात चकचकत्या समुद्रावरून आपले रुपेरी पंख हवेत पसरीत एखाद्या तेजस्वी देवदूताने अल-

गद उडत जावे आणि ते पाहाताना जसे मन हरखून जावे तसे होई त्या टिल्ल्या वेताळाला.

काव्याच्या प्रकाशातली वेगवेगळी दृश्ये पाहून एकदम रडूच कोसळे वेताळाला. कसले रडू ते त्यालाच कळेना. पण फार फार समाधानाचे अश्रू असत ते. "किती किती आल्हाददायक वाटेल त्या विद्यार्थ्याबरोबर त्या वृक्षाखाली बसणं – सारी रात्र काव्याच्या शीतल लहरींवर तरंगणं!....परंतु?....परंतु माझ्यासारख्या क्षुल्लक वेताळाच्या मानानं सुखाची परिसीमाच होईल ती! तिच्यासाठी कुठं माझी योग्यता?" वेताळाच्या मनात येई. आतले सुंदर दर्शन देणाऱ्या त्या चावीच्या भोकाचे उपकार मानी तो. निरुंद बोळकांड्यातल्या दाराशी, त्या भोकातून आत पाहात, सारी रात्र, तासचे तास तो वेताळ ताटकळत उभा राही. वाचनात तल्लीन झालेल्या विद्यार्थ्याकडे नि तिथे उमटलेल्या अद्वितीय दृश्यांकडे एकटक–टटार पहात राही तो.

छपरातल्या एका मोडक्या पोटदारातून हेमंतऋतूतला गारगार झोंबरा वारा घोंघावत आत येई. वेताळ थंडीने काकडून जाई. पण त्या छोट्या जिवाला त्या वाऱ्याची की थंडीची पर्वाच नव्हती. विद्यार्थ्याची मेणबत्ती मालवेपर्यंत आणि त्या मधुर संगीताचे अप्रतिम सूर घुमू लागून उदासवाण्या गारगार उत्तररात्रीत विरून जाईपर्यंत, जराही न कंटाळता तसाच ताटकळत राही वेताळ. बिचारा! नंतर दात कडकडत, थंडीने कुडकुडत नि कापत, तो हळूच त्या दुकानातल्या आपल्या ऊबदार कोपऱ्यात परत येई.



नाताळ आला. किराणेवाल्याने भल्या मोठ्या वाडग्यात ठेवलेली छानदार लापशी नि भला मोठा लोण्याचा गोळा वेताळाच्या पुढ्यात आला. धन्य धन्य वाटले वेताळाला. "बाकी मालक तो मालकच हं"! मिटक्या मारीत तो स्वतःशीच पुटपुटला.

काही दिवसांनी अशाच एका मध्यरात्री वेताळ खडबडून जागा झाला एकाएकी. खिडक्यांची तावदाने सारखी खडखडत होती. दुकानांची नि घरांची दारे ठोठावली जात होती.

"आSSSग!—आग लागली आSSSग!" रस्त्यावरच्या लोकांनी हलकल्लोळ माजवला



नुस्ता. गस्तवाल्याने घंटेचा गजर करून मोठ्यांदा इशारा दिला लोकांना. सबंध रस्त्यावर आगीच्या ज्वाळांचा लख्ख उजेड पडला.

"आग? कुठं लागली?—किराणेवाल्याच्या दुकानाला?—कि शेजारी?...लागली तरी कुठं आग?" लोक एकमेकांना गिल्ला करून मोठमोठ्याने विचारत होते.

दुकानदारीणबाई भेदरून गेली होती. तिने घाईघाईने आपल्या कानांतले सोन्याचे डूल काढून आपल्या खिशात टाकले. तिला वाटले की तेवढेच वचावतील. जर आगीत सगळे गेले तर! किराणेवालाही भांबावून गेला होता. आपल्या खतावण्या नि दस्तऐवजांची पुडकी शोधू लागला तो! आणि त्यांची मोलकरीण आपला रेशमी झगा बचावायला धावली!

प्रत्येकजण जी जी वस्तू हाती लागेल ती ती वाचवायला धडपडत होता. टिल्लया वेताळ जीव एकवटून पिसाटासारखा धावला दुकानातून वर. मागच्या जिन्यावरून अवध्या दोन उड्यात थेट पोटमाळा गाठला त्याने. विद्यार्थ्याच्या खोलीचे दार उघडेच होते.

विद्यार्थी आपली खिडकी उघडून रस्त्यावर पाहात होता. आगीकडे एकाग्र नजर लावली होती त्याने. शेजारच्या घराला लागली होती ती आग, त्याच्या स्वःच्या घराला नव्हे. ते जुने पण लाख मोलाचे पुस्तक टेबलावर तसेच ठेवलेले होते.

घाबऱ्याघाबऱ्या टिल्लया वेताळ उघड्या दारातून आत घुसला. त्याने एकदम झडप घातली त्या पुस्तकावर. आपल्या डोक्यावरच्या लाल चुटुक टोपीत ते कोंबले त्याने. दोन्ही हातांनी धरवेल तितकी गच्च नि ऊंच



धरली त्याने ती टोपी-एखाद्या टोपलीसारखी. त्या घरातली अत्यंत मौल्यवान वस्तू वेताळाने वाचवली होती. टोपी धरून धूम पळाला तो तिथून आणि तडक घराच्या छपरावर आला. अवघ्या एका सेकंदात तो धुरांड्याच्या एकदम वरच्या टोकावर जाऊन बसला. ते पुस्तक त्याही वर अगदी उंच होते–वेताळाने आपल्या डोक्यावर दोन्ही हातांनी अगदी उंच धरलेले-टोपीत जिवापाड जपलेले! त्या पुस्तकातले काव्य, त्यांतले दिव्यत्व जपले गेले होते. किराणेवाल्याच्या खतावण्यातल्या रुपये पैशांच्या खणखणाटापेक्षा त्या काव्यसंग्रहातल्या प्रशांत सुंदर प्रकाशाची, त्या दिव्यत्वाची किंमत टिल्लया वेताळाला लाखोपटींनी अधिक वाटली.

त्या धुरांड्याभोवती शेजारच्या घराच्या आगीच्या ज्वाळांनी जणू गराडा घातला. दोन्ही हातांनी आपली टोपी उंच धरण्याची शिकस्त करीत धुरांड्याच्या टोकाला बसलेला नि आगीने वेढलेला टिल्लया वेताळ म्हणजे एक मनाला चटका लावणारेच दृश्य! वेताळाचा खरा मालक कोण हे वेताळाच्या आता लक्षात आले. विद्यार्थ्यालाच त्याने आपला खराखुरा मालक मानले होते हे आता त्याच्या स्पष्ट लक्षात आले.

आग विझली. टिल्लया वेताळ भानावर आला. शांतपणे विचार करत बसला तो आपल्या धावपळीचा. खूप विचार करून तो स्वतःशीच म्हणाला, "मला वाटतं माझी निष्ठा नि स्वामिभक्ती विद्यार्थ्यावर आहे. तरी पण



व्यवहारासाठी ती मला दोघांत वाटावी लागेल! विद्यार्थ्यावरच माझी फार निष्ठा आहे यात प्रश्नच नाही पण रोजच्या खाण्याची नि लापशी नि लोण्याची काय वाट? त्यासाठी दुकानदारावरदेखील निष्ठा ठेवायलाच हवी!"

मित्र हो! वेताळाच्या या विचारात काय चुकले? आपण माणसे तर नेहमी फक्त निव्वळ व्यवहारच पाहतो....आपल्या पोटापाण्यासाठी नुसत्या मालकांनाच चिकटून बसतो की!



# सावली

उष्ण हवेच्या देशात सूर्याचे ऊन भयंकर प्रखर असते. तिथे लोकांचा रंग शिसवी लाकडासारखा तपकिरी होतो. अति उष्ण हवेच्या देशात तर तो करपून शिद्यांसारखा काळा होतो.

आपली ही गोष्ट त्या गुदमरवणाऱ्या अति-उष्ण हवेच्या देशातली खासच नाही. मात्र, थंडगार अशा उत्तरेकडला एक विद्वान मनुष्य कोण्या एके काळी, ज्या मध्यम उष्ण हवेच्या देशात गेला होता, तिथली आहे.

या विद्वान माणसाची प्रथम अशी कल्पना होती की त्याच्या स्वतःच्या देशातल्याप्रमाणे या उष्णदेशातही त्याला खुशाल हवे तेव्हा हिंडताफिरता येईल. परंतु लवकरच त्याचा तो भ्रम नाहीसा झाला. इतर सर्व समंजस लोकांप्रमाणे तोही सबंध दिवस दारे खिडक्या

बंद करून घरातच बसून राहू लागला. तिथली सामसूम पाहून नवख्या माणसाला त्या गावात आल्यावर वाटले असते की प्रत्येक घरातली माणसे झोपली तरी असावीत किंवा बाहेर गेलेली तरी असावीत.

निरुंद रस्त्यावरच्या उंच उंच घरांपैकी एकात तो राहात होता. तो निरुंद रस्ता अशा दिशेला होता की जिथे थेट सूर्योदयापासून तो संध्याकाळपर्यंत सतत ऊन येत राही. या थंड थंड प्रदेशातल्या विद्वान माणसाला त्यामुळे सारखे वाटे की तो गरम भट्टीवरच राहातो आहे जसा!

तो विद्वान माणूस तरुण होता नि सुज्ञ पण होता. एकदा त्या कडक उन्हामुळे त्याची प्रकृती बिघडली आणि तो बराच वाळला. त्याची सावलीदेखील रोडावली; कारण उन्हाचा त्याच्यावर नि सावलीवरही परिणाम झाला. पूर्वीपेक्षा, दिवसाची सावली जास्तच लहान दिसू लागली. सूर्यास्तानंतर रात्री मात्र तो माणूस नी त्याची सावली ठीक असत.

रात्रीचा तो फरक पाहायला खरोखरीच फार बरे वाटे. खोलीत दिवे आणताच सावली भिंतीच्या वरच्या टोकापर्यंत तर काय पण छतावरही उंच जाई. जशी काही, आपला मूळ आकार पुन्हा यावा म्हणून ती सावली स्वतःला शक्यतितकी ताणत असावी. तो विद्वान मनुष्य स्वतः गच्चीत जाई. मूळ आकार येण्यासाठी तो तिथे स्वतःचे हातपाय लांब करी. सुखद गार हवेत जेव्हा झळझळणाऱ्या निर्मळ ताऱ्यांकडे त्याचे लक्ष जाई तेव्हा तर त्याच्या अंगांगात नवे चैतन्य शिरे.

रात्री, रस्त्यावरच्या प्रत्येक गच्चीगच्चीतून नि सज्जातून स्त्रीपुरुषांच्या नव्या नव्या आकृती दृष्टीस पडत. उष्ण प्रदेशात, सज्जाशिवाय खिडक्याच नसतात; कारण लोकांना, शिसवाच्या रंगाचे बनायची सवय असली तरी मोकळी ताजी हवा ही अवश्यच हवी.

खाली आणि वर सर्वत्र हालचाल सुरू होई. खाटीक, पावरोटीवाले, चांभार, शिंपी सगळे रस्त्यात हिंडूफिरू लागत. खुर्च्या नि टेबले बाहेर मोकळ्यावर आणली जात आणि जिकडे तिकडे हजारो दिवे झगमगत. काही लोक मजेत हसत खिदळत, काही गाणी म्हणत, काही फिरायला निघत, काही गाडीतून जात, तर काही गाढवांवर स्वार होऊन फिरत. ते तसे स्वार होऊन जाताना गाढवाच्या खोगिरांतल्या चिमुकल्या घुंगरांचा, क्लिंगे-लिंगे-लिंग असा मोठा मजेशीर आवाज होई.

छोटी मुले तुडतुड्या नि फटाकडे वाजवीत. प्रार्थनामंदिरांच्या घंटांचा छान गोड आवाज घुमत राही. प्रार्थनांचा आवाज ऐकू येई. अनेक गंभीर अंत्ययात्राही तेव्हाच निघालेल्या दिसत. तेव्हा तर, लोकांच्या जमावांमुळे रस्ते खरोखरीच सजीव वाटत!

फक्त, एकाच घरात, आपला हा उत्तरेकडला विद्वान माणूस जिथे राही त्याच्या समोरच्या घरात चोवीस तास सर्व अगदी शांत असे. तिथे कोणी राहात नव्हते असे मात्र म्हणता यायचे नाही. कारण कोणीतरी त्या सज्जाला फुलझाडांनी शोभा आणली होती. लखलखीत सूर्यप्रकाशात फार सुरेख फुलली



होती ती आणि कोणी तरी पाणी घातल्या-शिवाय इतकी फुले येणे शक्यच नाही आणि पाणी घालायला कोणाचे तरी हात हवेतच.

शिवाय दर संध्याकाळी त्या समोरच्या सज्जाची खिडकी उघडली जात असे आणि बाहेरच्या खोलीत जरी काळोख असला तरी आतून कुठूनतरी गाण्याचे सूर ऐकू येत. तुलनाही करता येणार नाही इतके मधुर असत ते — निदान आपल्या या नवख्या विद्वान पाहुण्याला तरी तसे वाटे. कदाचित केवळ भास असेल त्याचा तसा, परंतु एकंदरीत त्या नवख्या विद्वान माणसाला या उष्ण प्रदेशात सूर्याच्या उन्हाखेरीज प्रत्येकच गोष्ट अतुलनीय मधुर वाटे! नवख्या विद्वान माणसाच्या घरमालकाने तर त्याला स्पष्ट सांगून टाकले होते की समोरच्या घरात कोण राहाते ते त्याला मुळीच ठाऊक नव्हते. तिथे त्याला कधीच कोणी दृष्टीस पडले नव्हते, आणि ते गाण्याचे सूर तर त्याला भल-तेच कंटाळवाणे वाटत असत! तो म्हणायचा, "गाण्याचे ते सूर म्हणजे, आपल्याला जे गाणं अजिबात गाता येत नाही त्याची पुन्हा पुन्हा कोणी तरी तालीम करतंयसं वाटतं—

नेहमी तेच सूर! कधीतरी नक्कीच येईल मला गाणं असं त्या गाणाऱ्याला खात्रीपूर्वक वाटत असावं. पण कितीही घोकंपट्टी केली तरी कधीही येणार नाही ते त्याला."

एकदा रात्री तो नवखा विद्वान पाहुणा अगदी गाढ झोपला होता. आपल्या उघड्या खिडकीच्या जवळच झोपला होता तो. वाऱ्याने खिडकीचे पडदे इकडे तिकडे उडत होते. त्या खिडकीतून समोरच्या घराचा सज्जा अत्यंत आश्चर्यकारकपणे झगमगीत शृंगारलेला दिसला एकदम. तियली सर्व फुले अत्यंत मोहक नि विविध रंगांच्या ज्वाळांसारखी झळझळत होती आणि त्या फुलांच्यामधे एक अतिशय सुरेख नि उंच तरुणी तिच्या मोठ्या वैभवांत उभी होती. तिच्या त्या वैभवाने त्या पाहुण्याचे डोळे दिपून गेले. त्याच्या कुतूहलात त्याने ते इतके विस्फारले की तो खडबडून जागा झाला.


एका झटक्यात तो उठून जमिनीवर उभा राहिला, हळूच पडद्याआड सरकला परन्तु तेवढ्यात, ती तरुणी पटकन नाहीशीही झाली! तिचे ते वैभव, ती फुले, सर्वच नाहीसे झाले आणि तिथे ती नित्याचीच फुले तेवढी राहिली! दार अर्धवट उघडे होते आणि अगदी आतून गाण्याचे अति मधुर स्वर ऐकू येत होते! खात्रीने काहीतरी चेटूक असावे तिथे, नाहीतर इतर कोण राहाणार अशा ठिकाणी?

एका संध्याळी तो विद्वान माणूस आपल्या सज्जात सहज बसला होता. त्याच्या पाठीकडे, खोलीत दिवे जळत होते, आणि स्वाभाविकपणे त्याची सावली समोरच्या घराच्या भिंतीवर



पडली. तिथल्या सज्जातल्या फुलझाडांत बसल्याप्रमाणे दिसू लागली होती. जेऱ्हा जेव्हा तो विद्वान पाहुणा म्हणजे त्या सावलीचा मालक हालचाल करी तेव्हा ती सावलीदेखील हालचाल करी.

तो विद्वान पाहुणा स्वतःशीच म्हणाला, "खात्रीनं, माझी सावलीच तेवढी त्या घरात



हालचाल करते आहे. त्या फुलझाडांत किती आरामात बसली आहे ती! आतल्या खोलीत जाण्याचं दार अर्धवट उघडं आहे. मला तर फार वाटतंय की त्या आतल्या खोलीत जाऊन तिथं काय आहे ते पाहाण्याचं माझ्या सावलीला सुचावं, नि तिथं काय काय पाहिलं ते तिनं लगेच मला येऊन सांगावं...."

मग तो सावलीला गमतीनं म्हणाला, "तुलाच ते फार सोइस्करपणे करता येईल. मेहेरबानी करून एक पाऊल हो पुढं. जाशील का तू?"

असं म्हणून त्याने सावलीकडे पाहून मान हलविली. आणि सावलीने उलट मान हलवून रुकार दिला.

"ठीक तर. मग जा तू. तिथं राहू नकोस हं मात्र"....असे तो पाहुणा म्हणाला आणि लगेच उठून उभा राहिला. त्याबरोबर समोरच्या सज्जातील त्याची सावलीही उठून उभी राहिली. तो पाहुणा मग पाठीमागे वळला. त्या सरशी ती सावलीही तशीच पाठीमागे वळली आणि कोणाही लक्षपूर्वक निरीक्षण करणाराला स्पष्ट दिसले असते की त्या अर्धवट उघड्या दारातून ती सावली झटकन आतल्या खोलीत शिरली! त्या समोरच्या घराच्या आतल्या दालनात गेली ती! त्याच क्षणी आपला विद्वान पाहुणा देखील आपल्या आतल्या खोलीत परत आला. त्याने आपल्या पाठीमागचे पडदे ओढून घेतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो विद्वान पाहुणा आपली कॉफी घेण्यासाठी आणि वर्तमानपत्रे वाचण्यासाठी बाहेर गेला. सूर्यप्रकाशात येताच तो उद्‌गारला,

"असं कसं झालं? अरेच्या! माझी सावली का नाही अजून माझ्याबरोबर? याचा अर्थ असा की काल संध्याकाळी ती जी खरो-खरीच त्या समोरच्या घराच्या आतल्या खोलीत गेली ती अजून परत आलेलीच नाही! खात्रीने सांगतो की ही गोष्ट म्हणजे अगदी सांगता येणार नाही इतकी मन अस्वस्थ करणारी आहे."

विद्वान माणूस फार बेचैन झाला होता. त्याची सावली गेली म्हणून नव्हे तर त्याच्या मायदेशी कोण्या एका मनुष्याला सावलीच नसल्याची एक प्रसिद्ध गोष्ट त्याने एकदा

ऐकलेली होती म्हणून. जरी आता त्याने त्या मायदेशच्या लोकांना आपली ही खरीखुरी गोष्ट सांगितली असती तरी त्याच्यावर ती जुनी गोष्ट चोरल्याचा आरोप आला असता. हे त्याला मुळीच पसंत पडणार नव्हते. म्हणून त्याने असा निश्चय केला की याबाबत कुठेही काही बोलायचे नाही. हा त्याचा विचार अर्थातच शहाणपणाचा होता.

त्या संध्याकाळी तो पुन्हा सज्जात आला. त्याने दिव्यासाठी पेटवलेल्या मेणबत्त्या आपल्या ठीक पाठीमागे ठेवल्या. कारण त्याला ठाऊक होते की आपल्या मालकाने आपल्या पार्श्वभूमीला राहावे असेच सावलीला नेहमी वाटत असते. परंतु तो पाहुणा आपल्या नाहीशा झालेल्या सावलीला काही केल्या बोलवू शकेना, आकर्षू शकेना !

त्याने आपले हातपाय लांब ताणले. पोटाशी घेतले. तऱ्हातऱ्हा केल्या पण सावली काही



दृष्टीस पडेना. त्याने 'हँ, हँ' करून आवाज काढले. पण काहीच उपयोग नव्हता. गोंधळून गेला तो विद्वान माणूस. तरीपण उष्ण प्रदेशात सर्व गोष्टी भराभर वाढतात असे म्हणतात. आणि त्याला अनुसरून आठ दिवस होऊन गेल्यानंतर एक दिवस उन्हात बाहेर जाताना त्याला आढळले की त्याची सावली त्याच्या पायाखालून हळूच हळूच पुढे येत होती ! बेफाट आनंद झाला त्याला. त्यावेळी सावलीचे मूळ फक्त त्याच्या पायाशीच राहिले होते. परंतु तीन आठवड्यांच्या पुढच्या काळात त्याच्या सावलीने पुन्हा लक्षात येण्याजोगा मोठा आकार धरला. काही दिवसांनी सरतेशेवटी ती इतकी लांब आणि रुंद वाढली की तिचा अर्धाच भाग त्याला पुरेसा झाला असता.

काही काळाने हा विद्वान मनुष्य थंडगार अशा आपल्या स्वतःच्या मायदेशी परतला. तिथे त्याने जगात पाहिलेल्या सर्व चांगल्या सत्य नि सुंदर गोष्टींबद्दल पुस्तकेही लिहिली. पुष्कळ दिवस उलटले त्यानंतर. पुष्कळ आठवडेही लोटले. वर्षेही लोटली. अनेक वर्षे लोटली.

एका संध्याकाळी मात्र तो आपल्या खोली-मध्ये एकटाच बसला असताना त्याच्या दारावर कोणीतरी हलकेच टिकटिक करीत असल्याचे त्याला ऐकू आले.

"आत या" तो म्हणाला.

परंतु आत तर कोणीच आले नाही. म्हणून तो उठला आणि त्याने दार उघडले. त्याच्या-समोर एक माणूस उभा होता. इतका बारीक आणि कृश की त्याच्या त्या आकृतीने त्या आपल्या विद्वान माणसाला धक्काच बसला

एकदम. या नवख्या अतिथीचा पोशाख मात्र भारी झक्क होता आणि तो कोणीतरी बडा मनुष्य वाटत होता. आपला विद्वान माणूस म्हणाला,

"कोणा महान व्यक्तीशी बोलण्याचं भाग्य लाभतंय मला हे?"

तो कृश गृहस्थ म्हणाला,

"ओ हो! तरी मला वाटलंच! मला वाटलंच होतं की तुम्ही मला ओळखणार नाही म्हणून! हल्ली हल्ली तर मला बराच आकार आला आहे. माझ्या अंगावर मांसही चढलं आहे आणि कपडेही घालतो मी. मी खात्रीनं सांगतो इतक्या उत्कृष्ट स्थितीत मी तुम्हांला दिसेन अशी तुम्ही कधी कल्पनाच केली नसावी. तुमच्या या जुन्या सावलीला तुम्ही ओळखलं नाहीत वाटतं! मला आता श्रीयुत् सावली म्हणतात एवढाच फरक. हं हं. कदाचित तुम्ही कल्पना केली असेल की मी परत कधी येणारच नाही. तुमच्याजवळून मी गेलोना, त्यानंतर एकंदर घटना इतक्या चांगल्या घडून आल्या की मी आता बराच श्रीमंतही झालोय. जर गरजच पडली तर तुमच्याजवळून गेल्याबद्दल नुकसानभरपाई म्हणून मी हवे तेवढे पैसेही तुम्हांला देऊ शकेन."

आणि असे म्हणून आपल्या गळ्याभोवती लटकवलेल्या, घड्याळाच्या जड सोन्याच्या सांखळीवरून त्याने झोकात हात फिरवला आणि त्याला लटकलेल्या अनेक जड पुतळ्यांचा झुपका त्याने खळखळ वाजवला! शिवाय बापरे, त्याची बोटं? तर ती त्यांच्याभोवती वेढलेल्या हिऱ्याच्या अंगठ्यांनी झगमगत होती



नुसती! आणि हे सर्व अगदी अगदी खर होते!!

"छे: मला उमजच पडत नाही या सगळ्याचा. हे सगळं चाललंय तरी काय?" तो विद्वान गृहस्थ भांबावून म्हणाला.

श्रीयुत् सावली म्हणाला, "शांत व्हा! हे सर्व जरा न्यारंच आहे यांत खरोखरी शंका नाही. पण तुम्ही स्वतः सुद्धा साधासुधे नसून न्यारेच आहात की! शिवाय तुम्हांला ठाऊकच आहे की अगदी तुमच्या बाळपणापासून तुमच्या पावलावर पावलं टाकीत चाललो आहे मी. तुम्हांलाच जेव्हा वाटलं की मी एकटाच कुठंतरी जाऊ शकेन इतकी माझ्यात ताकद आलेली आहे तेव्हा तुमच्याच आज्ञेनं मी जगात एकटाच माझ्या हिंमतीवर हिंडायला निघालो. माझी परिस्थिति कमालीची भरभराटीची आहे आता. तरीपण तुम्ही कधीतरी मृत्यूच्या घरी

जाण्याआधी, तुम्हांला अवश्य एकदा भेटावं अशी फार तळमळ लागली होती माझ्या मनाला. शिवाय अशी ही एक इच्छा उत्पन्न झाली होती की या देशाचं पुन्हा दर्शन घ्यावं, कारण कोणाच्याही मनात मायदेशाबद्दलचं प्रेम उचंबळल्याखेरीज राहात नाही. मला ठाऊक आहे की तुमच्याबरोबर आता कोणी निराळीच सावली असते नेहमी. नवीन सावली नेमावी लागल्याबद्दल मी तुम्हांला काही नुकसानभरपाई द्यायला हवी का? कृपया किती द्यायची ती सांगा पाहू जरा...."

विद्वान गृहस्थाने किंचाळतच विचारले,

खरंच? अगदी खराखुराच माझी जुनी सावली आहेस का तू? हे म्हणजे कमालीचंच जगावेगळं नि वेड लावणारं आहे. माझा कधीच विश्वास बसला नसता की माझी जुनी सावली प्रत्यक्ष माणूस बनून माझ्याकडे कधी येईल!"

"हं. तर चटकन सांगा पाहू मी तुम्हांला किती रकम द्यायची ती? वाटेल ते झालं तरी मी कोणाच्या कधी कर्जात राहाणार नाही." सावली म्हणाली.

विद्वान गृहस्थ म्हणाला, "अरे तू बोलू तरी कसं शकतोस हे? कर्जाबद्दल कशाला विचारत सुटला आहेस? तू संपूर्णपणे कर्जमुक्त आहेस आणि तुझ्या सद्भाग्याबद्दल मला अत्यंत आनंद आहे, कळलं. माझ्या जुन्या मित्रा, जरा बस इथं, नि हे सगळं कसं काय झालं ते सांग. त्या उष्ण प्रदेशातल्या माझ्या घरासमोरच्या गूढ घरात तू काय पाहिलंस ते तरी सांग."

विनंतीप्रमाणे खाली बसत श्री. सावली म्हणाला,

"ठीक. सांगतो तुम्हांला सारं. पण प्रथम तुम्ही मला वचन दिलं पाहिजे की, तुम्ही चुकूनही कोणाला सांगता कामा नये की, कधीकाळी मी केवळ एक सावली होतो तुमची. कारण, लवकरच लग्नही करायचा बेत आहे माझा. एका कुटुंबाच्या पोषणाला पुरून उरेल इतका पैसा आता आहे माझ्याजवळ."

"मुळीच घाबरू नकोस." तो विद्वान मनुष्य म्हणाला. "तू खरा काय आहेस ते जरादेखील कळू देणार नाही मी कोणाला. बस? हा माझा हात वचनासाठी पुढं करतो धर. एका सज्जन माणसाचा शब्द आहे माझं हे वचन."

"आणि मी सुद्धा एका सज्जन सावलीचे शब्द म्हणून सारं खरं सांगेन." ती पुरुषरूपधारी गूढ सावली म्हणाली.

त्या सावलीने किती तंतोतंत मनुष्यरूप धारण केले होते हे पाहून अत्यंत आश्चर्य वाटले असते कोणालाही. त्याचा पोषाख संपूर्ण काळा होता. अतिशय ऊंची काळ्या कापडाचा कोट होता. चकचकते बूट अतिशय नरम उंची कातड्याचे होते. हॅट तर जरा दाबल्यावर एखाद्या किनार असलेल्या मुकुटासारखीच दिसली असती. शिवाय ती आधी वर्णन केलेली सोन्याची साखळी, पुतळ्या आणि हिऱ्याच्या अंगठ्या ज्यांचे वर्णनही करता येणार नाही अशा वस्तूही होत्याच. असा त्याचा हा सर्व जमानिमा भारी विस्मयकारक होता.

त्या सावलीने सहजासहजी दृष्टीस पडणार नाही असा आगळाच पोशाख केला होता म्हणाना. मुख्य म्हणजे या पोशाखामुळेच ती

सावली संशयही येणार नाही इतकी मनुष्यरूप वाटत होती.

"हं तर आता माझी गोष्ट सांगतो तुम्हांला" सावली विद्वान माणसाला म्हणाली.

असे म्हणताना त्या विद्वान माणसाच्या पायाशी एखाद्या काळ्या केसाळ नि पाळीव कुत्र्याप्रमाणे बसलेल्या त्याच्या नव्या सावलीच्या बाहूंवर जुन्या सावलीने आपल्या चकचकीत बुटासहित आपले पाय हळूच पण पक्के रोवले. कदाचित स्वतःच्या घमेंडीत केले असेल हे तिने किंवा त्या नव्या सावलीने आपल्या त्या विद्वान माणसाला सोडून जुन्या सावलीशी मैत्री करण्याचे मनात घ्यावे अशासाठीही असेल. नवी सावली लगेच आपल्या जागेवर जशीच्या तशी हालचाल न करता खिळून राहिली. एक अक्षरही उच्चारले नाही तिने. कारण कधीकाळी, आपणही मालकापासून मुक्त होऊन पूर्णपणे स्वतंत्र व्हावे असे तिलाही फार वाटत असावे.

श्री. सावलीने विद्वान माणसाला मोठ्या ऐटीत विचारले,

"त्या समोरच्या घरात कोण असावं? काय वाटतं तुम्हांला? काव्यदेवी! अत्यंत मोहक, अत्यंत सुंदर काव्यदेवी!! मी अवघा तीन आठवडे होतो तिथे आणि तीन हजार वर्षे राहात असल्यासारखं वाटलं मला. इतकंच तर काय पण त्या काळात कल्पिलेलं नि प्रत्यक्ष लिहिलेलं सर्व काही प्रत्यक्ष वाचल्यासारखं देखील वाटलं मला. ..".

तो विद्वान माणूस आश्चर्यात ओरडला,

"काव्यदेवी!....हो खरंच, बरेचदा ती भरगच्च मोठाल्या शहरात एखाद्या योगिनीप्रमाणे एकटीच रहात असते. काव्यदेवी!....हो, मी—पण पाहिलं आहे तिला, पण केवळ क्षणभरच जेव्हा माझे डोळे झोपेने भारावले होते! त्या सज्जात उभी होती ती....उत्तरेच्या हिम-प्रकाशासारखी. प्रसन्न आणि दैदिप्यमान! सांग कृपा करून....सांग, सांग. तू प्रथम सज्जात होतास....तू नंतर दारातून आत गेलास.... आणि? आणि पुढे–?"

सावलीने उत्तर दिले, "पुढं?....पुढं मी तिथल्या बाजूच्या दिवाणखान्यात गेलो की. तुम्हांला आठवत असेल की तुम्ही त्या दिवाण-खान्याकडे एकसारखी नजर लावून बसायचे. दिवा लावलेला नसे तिथे–त्या ऐवजी एक प्रकारचा मंद संधिप्रकाशच असे. परंतु दारा-मागून दारे ओलांडताना, अनेक खोल्या नि दिवाणखान्यातून जावे लागले मला. बऱ्याच अंतरावर पुढे तर मला इतके दिवे दिसले की जणू रोषणाईच! नक्की सांगतो की जर का मी काव्यदेवीच्या खास दालनात गेलो असतो तर तिथल्या दिव्यांच्या प्रकाशझोताने ठारच झालो असतो. इतका झगमगाट होता तिथं तर...."

विद्वान माणूस म्हणाला, "आणि तिथं काय पाहिलंस?"

"सर्व काही पाहिलं मी!" सावली उत्तरली.

विद्वान माणसाने पुन्हा विचारले, "आणि ती आतली दालनं कशासारखी वाटली तुला? तजेलदार हवा खेळत असलेल्या प्रशान्त वृक्ष-वाटिकांप्रमाणे?....पवित्र प्रार्थनामंदिराप्रमाणे? तिथली निवडक प्रशस्त दालने, एखाद्या पर्वताच्या टोकावरून पाहाताना ताऱ्यांनी

लखलखणारे आकाशमंडळ दिसावे तशी दिसत होती ?"

सावलीने उत्तर दिले, "जे जे म्हणून सुंदर असेल ते सर्व तिथं होतं. मी तसा थेट आत पर्यंत गेलो नाही. बाहेरच्या खोलीच्या संधिप्रकाशातच थांबलो मी; अगदी उत्कृष्ट जागा होती ती. सर्व काही पाहिलं मी आणि सर्व काही ठाऊक झालंय मला. मी काव्यदेवीच्या दरबारातच गेलो होतो — सज्जाच्या बाजूच्या दालनात गेलो होतो."

विद्वान माणसाने पुन्हा प्रश्न केला,

"अरे पण तिथं पाहिलंस काय तू ?—ते तर सांगतच नाहीस ! काय काय होतं तिथं ? त्या प्रशस्त दालनातून सर्व प्राचीन देवदेवता येजा करीत होत्या ? जुन्या काळातल्याप्रमाणे शूर योद्धे आणि लढवय्ये सरदार लढाया करीत होते का ? तिथं गोजिरवाणी नि पऱ्यांसारखी चिंगुली चिंगुली मुलं हिंडताना नि आपली मनोहर स्वप्नं सांगताना दिसत होती का ?"

सावली म्हणाली, "अरेच्या पुन्हा पुन्हा तुम्हांला तेच तर सांगतो मी — तुम्ही नीट ऐका पाहण्यासारखं सर्व काही मी पाहिलं तिथं आणि शिवाय मी सावलीचं रूप टाकून माणूस बनलो - तुम्ही जर तिथं गेला असता तर मुळातच माणूस असल्यामुळे तुमच्याहूनही जास्तसं काही तरी झाला असता. मला स्वतःच्या स्वभावधर्माची माहिती मिळाली, गुणधर्मांची माहिती मिळाली; आणि काव्यदेवीशी माझं नातं काय आहे तेही कळलं. तुमच्या सहवासात मला या गोष्टीचं फारसं महत्त्व वाटलं नव्हतं. सूर्योदयाच्या किंवा अस्ताच्या वेळी मी कमालीचा उंच होई.

चंद्रप्रकाशात तर माझ्या स्वतःपेक्षाही मी इतरांच्या जास्त लक्षात राही. पण तेव्हा माझा स्वतःचा स्वभाव मला मुळीच ठाऊक नव्हता. त्या सज्जाच्या आतल्या दालनात मला सर्व स्पष्ट कळलं आणि हा असा माणूस बनलो मी ! ते घर सोडताना तर अगदी नखशिखांत बदल झाला माझ्यात.

तुम्ही तेव्हा त्या उष्ण देशात नव्हता आणि मला तर मनुष्यरूपात त्या स्थितीत फिरताना भारी लाज वाटायची. मला कपडे हवे होते — बूट हवे होते — थोडक्यात माणसाला, माणूस म्हणून ओळखू यायला लागणारा सारा पेहराव हवा होता. मी एका स्वैपाकणीच्या पायघोळ बुरख्यात शिरलो चटदिशी. त्याच्यातच लपून राहिलों मी. तिला कल्पना पण नसेल की तिच्या बुरख्यात कोणी आश्रय घेतला असेल. मी बुरख्यांतून प्रथमच बाहेर पडलो तेव्हा तिन्हिसांजा झाल्या होत्या. चंद्रप्रकाशात मी रस्त्यावरून धावत सुटलो. भिंतीलगत माझे हात ताणून आळोखे पिळोखे दिले मी — खरंच भिंतीला पाठ लागली की किती गार नि छान वाटतं ! मी वरच्या रस्त्यावर धावायचा, अगदी सर्वांत वरच्या खोल्यांतून डोकावायचा, पोटमाळ्याच्या खिडक्यांतून देखील डोकावायचा. इतर कोणीही जिथं डोकावू शकणार नाही, अशा ठिकाणीही डोकावलो मी आणि इतर कोणीही पाहू शकणार नाही अशा गोष्टीही पाहिल्या मी ! माझ्या मते या जगातल्या माणसांच्या फार दारिद्र्यपूर्ण नि दुर्दैवी कहाण्या आहेत त्या. आणि हा असा



वडेजाव मिळत नसता तर मी माणूस कधीच झालो नसतो. सर्व जातींच्या नि दर्जांच्या लोकांच्या अत्यंत दुःखद नि विलक्षण गोष्टीही ऐकल्या मी." ती सावली पुढे आवेशात म्हणाली, "कोणालाही ठाऊक असू नयेत अशा अनेक गोष्टी ठाऊक झाल्या मला. प्रत्येकाच्या शेजाऱ्यांची गुपचूप चाललेली दुष्ट कारस्थाने! मी जर त्याबाबत एखादं नवं मासिक काढलं असतं तर लोकांनी खचित वाचलं असतं ते, नाही? परंतु त्याऐवजी, ज्यांची कृत्ये मी स्वतः पाहिली होती त्या प्रत्येकाला मी वैयक्तिक पत्रे लिहिली. अशामुळे ज्या गावीं मी गेलो तिथं सर्वांच्या मनात मी विस्मय आणि भीति उत्पन्न केली. सगळे मला इतके घाबरू लागले म्हणता!–नि–इतके लोभही करू लागले माझ्यावर!

प्राचार्यांनी मलाही प्राचार्य बनविले. शिष्यांनी मला नवे कपडे दिले, तुम्हांला दिसतंच

आहे किती चांगल्या वस्तू आहेत माझ्याजवळ ते. नाणेवाल्यांनी माझ्यासाठी नवी नाणी पाडली, आणि स्त्रिया तर म्हणू लागल्या की मी फारच देखणा आहे म्हणून! अशा तऱ्हेनं तुम्ही पहात असलेला हा माणूस बनलो मी. आता मात्र मला तुमचा निरोप घ्यायला हवा. हे माझ्या नावाचं कार्ड ठेवा तुम्हांला. उन्हाळ्यात रस्त्याच्या पट्टीला राहातो मी नेहमी आणि पावसाळ्यात मी घरातच असतो सदा"

असे म्हणून ती सावली निघून गेली!

विद्वान मनुष्य आश्चर्याच्या धक्क्यात म्हणाला, "विलक्षण! खरोखर, भारीच विलक्षण!"

अनेक दिवस निघून गेले—वर्षेही निघून गेली. सावली पुन्हा आली एकदा.

तिने विचारले, "कसं काय चाललंय तुमचं? ठीक?"

विद्वान माणसाने निःश्वास टाकला. तो म्हणाला, "होय! मी अजूनही जे सत्य असेल, चांगलं असेल नि सुंदर असेल त्याबद्दलच माझं लेखन करीत असतो! पण अशा गोष्टींबद्दल कोणालाच आस्था नि आवड नाही असं दिसतं. फार निराश वाटतं मला तर. किंवा मला वाटतं, मी फार मनाला लावून घेतो साऱ्या गोष्टी."

सावलीने उलट म्हटले, "मी मुळीच तसं करीत नाही. मी लठ्ठ होत चाललोय. पाहिलंत? सर्वांनीच व्हायला पाहिजे असं. जग समजतच नाही तुम्हांला आणि म्हणून तुम्ही असे निराश होऊन स्वतःचे हाल करून घेता. प्रवास केला पाहिजे तुम्ही पुष्कळ. या उन्हाळ्यात मी एक मोठी सहल करणार आहे. माझ्याबरोबर आलात तर काय होईल? मी देईन तुमचा खर्च...."

"मोठी चमत्कारिकच विचारणा!" असं म्हणून तो विद्वान माणूस या कल्पनेला हंसला. "हरकत काय आहे जर दोघांचीही सोय होत असेल तर? प्रवासाच्या कल्पनांनी बरं वाटेल तुम्हांला. तुम्ही फक्त माझी सावली म्हणून वावरायचं! आणि तुम्हांला हवं असलेलं सर्व काही मिळेल तुम्हांला. कबूल?" सावली म्हणाली!

"मी तुझी सावली! भलतंच काहीतरी! वेड लागलंय तुला!"

विद्वान माणूस एकदम म्हणाला.

"मला जर वेड लागलं असं वाटत असेल तर ते जगालाही लागलंयसं म्हटलं पाहिजे. आणि जगाच्या अंतापर्यंत जग वेडंच राहील." असे म्हणून सावली निघूनही गेली तिथून.

त्यानंतरच्या काळात त्या विद्वान माणसाची स्थिती जास्तच खालावत गेली. दुःख नि चिंता यांनी ग्रासून टाकले त्याला आणि त्याच्या सत्य, चांगल्या नि सुंदर गोष्टीच्या लिखाणाबद्दल म्हणायचे तर जगातल्या बहुतेक लोकांना त्याची तितकीच किंमत वाटे, जितकी एखाद्या गायीच्या पायाशी विखुरल्या गुलाबांच्या फुलांबद्दल त्या गायीला किंमत वाटावी!

शेवटी तर तो विद्वान माणूस सरळ आजारीच पडला !

त्याचे मित्र म्हणू लागले, "तू तर हुबेहूब एखाद्या सावली एवढा वाळला आहेस."

हे शब्द ऐकून गारगार शिरशिरी जाई त्याच्या साऱ्या अंगातून.

पुन्हा जेव्हा सावली त्याच्या भेटीला आली तेव्हा म्हणाली, "तुम्ही किनई, प्रवासाला गेलं पाहिजे. दुसरा उपायच नाही तुम्हांला. माझी तुमची जुनी ओळख म्हणून मी नेईन तुम्हांला हवं तर. मी तुमच्या जाण्यायेण्याचा खर्च करीन आणि तुम्ही वाटेत तऱ्हेतऱ्हेची वर्णने लिहून माझी करमणूक करा. मला स्वतःला देखील नेमानं प्रवासाला जायचय–कारण माझी ही दाढी म्हणावी तशी नीट वाढतच नाही. एखादा रोग होण्याइतकंच वाईट दिसतं ते. आणि दाढी असल्याशिवाय माणसाचं निभणारच कसं? आता नीट जरा ऐका आपण एकमेकांचे साथी म्हणून बरोबर प्रवास करू."

म्हणून नंतर ते प्रवासाला निघाले. सावली आता मालक बनली होती आणि तिचा खरा मालक तो विद्वान माणूस, सावली बनला होता त्यांनी, गाड्या हाकारल्या, गाडीतून ते बरोबर गेले! दोघांनी बरोबर बरोबर पायी प्रवास केला कधी ते एकमेकांच्या बाजूने चालत तर कधी एकमेकांच्या मागेपुढे; सूर्य जसा असेल तसे ते चालत.

सावली मात्र स्वतःला नेहमी मोक्याची जागा मिळेल अशी खबरदारी घेई. विद्वान माणसाला त्याचे काहीच विशेष वाटेना. तो खरा दयाळू माणूस होता आणि शांत स्वभावाचा होता.

ते एकदा एका आरामकेंद्रात आले. अनेक नवखे लोक होते तिथे आणि त्यांच्यात राजाची मुलगीही होती. फारच सुंदर होती. विशेष म्हणजे तिची दृष्टी फारच तीक्ष्ण होती. इतकी की बेचैन होई त्यामुळे ती आणि हा तिचा आजारच होता एक प्रकारचा.

तिच्या एकदम लक्षात आले की हा नवीन मनुष्य इतरांपेक्षा अजिबात निराळा होता. ती म्हणाली, "लोक म्हणतात की त्याची दाढी वाढत नाही म्हणून तो या गावी आलेला आहे. परंतु मला तर त्याचं खरं कारण निराळंच दिसतंय. त्याची सावलीच पडत नाही!"

तिचे कुतूहल आणखीनच वाढले. म्हणून एक दिवस फिरायला जाताना त्याला भेटल्यावर त्याला विचारण्याची तिने संधी साधली. राजाची राजकन्या असल्यामुळे त्याच्याशी कशा तऱ्हेने बोलावे याचा तिला विचार करण्याची गरजच नव्हती. तिने सरळ सरळ त्याला विचारले,

"तुम्हांला तुमची सावलीच पाडता येत नाही, हाच तुमचा आजार आहे ना?"

मनुष्यरूपधारी सावलीने उत्तर दिले,

"राजकुमारी बाईसाहेबांची प्रकृति जरा सुधारली आहे हे पाहून समाधान वाटतं मला. मला ठाऊक आहे की तीक्ष्ण दृष्टी असण्याचं दुर्दैव तुमच्या वाट्याला आलेलं आहे. परंतु हा



तुमचा रोग संपूर्णपणे जायला हवा बरं का. कारण, आताच पाहाना, माझी सावली अगदी वेगळ्याच तऱ्हेने परंतु माझ्याबरोबरच असते. माझ्या बाजूबाजूनं चालणारा तो माणूस पाहाता ना तुम्ही? तो माणूस नसून ती माझी सावली आहे! माणसांना त्यांची रोजची छायाच सावलीसारखी उपयोगी पडते. परंतु मला, जे नेहमी आढळणारं नि सर्वसामान्य असेल ते मुळीच आवडत नाही. तुमच्या हे कदाचित ध्यानात आलं असेल की काही लोक स्वतःच्या पोपाखापेक्षा नोकरांना खूप भारी पोपाख देतात. त्याचप्रमाणे मी देखील माझ्या सावलीला माणसासारखा पोपाख करण्याची सवलत दिली आहे. इतकंच तर काय पण माझ्या सावलीला तिची स्वतःची अशी स्वतंत्र पडसावली देखील दिली आहे! आता हा प्रकार बराच खर्चाचा आहे हे खरं, पण मला असं न्यारेपण भारी आवडतं."

राजकन्या स्वतःशीच म्हणाली, "काय? मी खरंच का माझ्या दृष्टिदोषाच्या आजारातून बरी झाले आहे? या आरामकेंद्रातला हा पोहण्याचा तलाव साऱ्या जगात उत्कृष्ट दिसतोय तर! आणि हल्लीच्या काळात पाण्यात देखील फार आश्चर्यकारक सामर्थ्य असतंसं वाटायला

लागलंय मला. इथून मी हलणारच नाही आता, कारण इथंच माझं मन रमायला लागलंय. या अनोळखी माणसाबद्दल तर फारच आदर वाटू लागला आहे मला. त्याची दाढी न वाढेल तरच बरं, कारण नाही तर इथून निघून जाईल तो...."

आरामकेंद्राच्या भल्या मोठ्या नृत्यगृहात ती राजकन्या आणि ती मनुष्यरूपधारी सावली यांनी एकत्र नृत्य केले. ती राजकन्या वजनाला फार हलकी होती परंतु सावली तर तिच्याहूनही हलकी होती. नृत्य करताना सावलीने तिला सांगितले की, "तिने अनेक खिडक्यांतून खालच्या नि वरच्या मजल्यावर डोकावले....या गोष्टी पाहिल्या नि त्या गोष्टी पाहिल्या....राजकन्येच्या हरेक प्रश्नाचे उत्तर तिला कसे ठाऊक होते — वगैरे वगैरे —" राजकन्या ते ऐकून आश्चर्याने थक्कच झाली. तिला वाटले की अखंड जगात त्या सावली-इतका ज्ञानी माणूसच नसावा! तिच्या मनात त्या सावलीबद्दल कमालीचा आदर उत्पन्न झाला. नृत्याच्या दुसऱ्या फेरीच्या वेळी तर सावलीच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या प्रेमातच पडली ती जवळजवळ. कारण ती राजकन्या त्या सावली-कडे सरळसरळ त्याच्या नजरेत नजर भिडवून पाहू लागली. नंतर त्यांची नृत्याची आणखीही एक फेरी झाली. राजकन्या श्रीयुत् सावलीला आपल्या प्रेमाबद्दल अगदी सांगण्याच्या बेतात होती;परंतु तिला आपल्या देशाची, आपल्या शाही खानदानाची आणि ज्या राज्यावर तिला पुढे राज्य करायचे होते त्याची आठवण आली. ती स्वतःशी म्हणाली, "हा मनुष्य सूज्ञ आहे हे ठीक; हा एक चांगला गुण आहे त्याचा. तो नृत्यात पारंगत आहे हा दुसरा चांगला गुण झाला. परंतु तो खरोखरीच ज्ञानी असेल किंवा नाही याची शंका येते. ते सुद्धा तितकंच महत्त्वाचं आहे. त्याची जरा परीक्षा घ्यायला हवी—" असे म्हणून तिने हळूहळू तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न त्या सावलीला विचारायला सुरवात केली. प्रश्न असे होते की त्या प्रत्येकाचे उत्तर तिला स्वतःलाही देता आले नसते. सावलीने फारच चमत्कारिक चेहरा केला.

राजकन्या म्हणाली, "याचं उत्तर ठाऊक आहे तुम्हांला?" सावलीने उत्तर दिले, "हात्तेच्या! माझ्या बाळपणापासूनच ठाऊक आहे की मला ते. एवढंच तर काय पण तिथं त्या दाराशी बसलेल्या माझ्या सावलीला देखील ठाऊक आहेत ते!"

"तुमच्या सावलीला? चमत्कारच म्हणा-यचा मग!"

सावली पुन्हा म्हणाली, "माझी सावली खात्रीपूर्वक उत्तर सांगेलच असं मी म्हणत नाही; परंतु मला तसं वाटतं. मी काय बोलतो ते ऐकत ऐकत इतकी वर्षं ती माझ्या मागेमागे फिरली आहे—म्हणून वाटतं की ती नक्की सांगू शकेल. परंतु राजकन्यासाहेबांच्या परवानगीनं असंही म्हणायचंय मला की, माझ्या त्या सावलीला माणूस म्हणून मिरवायला फार आवडतं. त्यानं उत्तरं द्यावी म्हणून त्याला जर त्याच्या योग्य लहरीत ठेवायचं असेल आणि योग्य उत्तरं हवी असतील तर तसं केलंच पाहिजे—त्याला माणूस म्हणूनच लेखायला हवं—राजकन्यासाहेबांनी."



राजकन्या म्हणाली, "मला आवडली ही गमतीदार कल्पना."

असे म्हणून ती पलीकडे दाराशी बसलेल्या त्या विद्वान माणसाकडे गेली. तिने त्याच्याशी सूर्याविषयी चर्चा केली, चंद्राविषयी चर्चा केली, मनुष्यप्राणी आतून कसा असतो, बाहेर कसा दिसतो हेही विचारले तिने! आणि त्याने त्या सर्वही प्रश्नांची समर्पक आणि बिनचूक उत्तरे दिली.

तिला वाटले, "ज्याची सावली इतकी विद्वान, तो मनुष्य स्वतः किती विद्वान असेल! ह्या माणसाला जर मी माझा पती निवडला तर माझ्या राज्याला आणि लोकांना ही निवड एक खरंखुरं वरदानच होईल! बस ठरलं...."

आणि लवकरच त्या राजकन्येने आणि मनुष्यरूपधारी सावलीने लग्न ठरवले! फक्त तिच्या राज्यात, घरी परतण्याआधी ती ते कोणाला कळू देणार नव्हती.

मनुष्यरूपधारी सावली राजकन्येला म्हणाली, "कोणालाही नको कळायला, माझ्या स्वतःच्या सावलीला देखील!" – त्याचे खास निराळेच कारण होते मात्र....

मनुष्यरूपधारी सावली नंतर त्या सावली बनणाऱ्या विद्वान माणसाला म्हणाली, "हे बघ जुन्या दोस्ता, एकेरी हाक मारतो हं. ऐक मी काय म्हणतो ते. इतर कोणाही माणसाइतका मी सामर्थ्यवान आणि यशस्वी बनलो आहे हे तुला कळलं ना. आता मी तुझ्यासाठी एक खास निराळीच गोष्ट



करणार आहे. तू राजवाड्यात नेहमी माझ्याबरोबरच राहायचं बरं का. शाही बग्गीतून मी जात असता तू माझ्याबरोबरच जायचं. आणि त्याबद्दल माझ्याकडून सालिना पाच हजार पौंड पगार घ्यायचा. याच्या मोबदल्यात तू माझी सावली आहेस असंच सर्वांना भासवायचं नि म्हणू द्यायचं. आणि कधीही कोणाला सांगायचं नाही की कधीकाळी तू खराखरा माणूस होतास. शिवाय वर्षातून एकदा मी जेव्हा डौलात, माझ्या सज्जात सूर्याचं ऊन खात बसलेलो असेन तेव्हा तू माझ्या पायाशी माझ्या सावलीप्रमाणे बसून राहायचं. आणि हेही ठाऊक असू दे की राजकन्येचं नि माझं लग्न ठरलं आहे. आणि अशाच एका संध्याकाळी आमचं लग्न लागणार आहे.

विद्वान माणूस उसळून म्हणाला, "आता शर्थ झाली तुझी! छे:, मी मुळीच नाही....मी कधीच नाही ते करणार! हे राजकन्येच्या या सर्व देशाला धडधडीत फसवणं आहे; आणि वर या खोट्या सौद्यात राजकन्या पटकावणं म्हणजे भयानकच!

मी सारं काही खरं सांगून टाकेन लोकांना.

राजकन्येचं सावलीशी लग्न? छट्! लोकांना मी सांगेन की खराखुरा माणूस मी असून तूच खरी सावली आहेस, तू हे फक्त माणसाचं सोंग पांघरलं आहेस."

सावली म्हणाली, "कोणाचाही विश्वास बसणार नाही त्यावर. आता जरा डोकं ताळ्यावर असल्यासारखा वाग नाही तर इथल्या रखवालदारालाच मी बोलावतो ताबडतोब!"

विद्वान माणूस म्हणाला, "मी सरळ त्या राजकन्येकडेच जातो, तू काय समजलास?"

सावली चिडून म्हणाली, "थांब, मीच जाणार आहे आधी. आणि तू राजकन्येच्या दिवाणखान्याऐवजी तुरुंगाच्या कोठडीत जाणार आहेस समजलास!"

त्याला लगेच कैदीही करण्यात आले. पहारेकऱ्यांनी, ज्याचे राजकन्येशी लग्न होणार होते, त्याचेच अर्थात ऐकले. कारण राजकन्येनेही त्यांना काय करायला सांगितले असते ते त्यांना माहीत होते.

ती मनुष्यरूपधारी सावली राजकन्येकडे जाताच राजकन्या गोंधळून सावलीला म्हणाली,

"अंऽऽ! तुम्ही तर चळचळ कापता आहांत, झालंय काय तुम्हाला?" सावली तिच्या जवळ जाऊन थरथरत उभी राहिली.

"कां? काही झालंय का कुठं? आज रात्री तुम्ही बिलकूल आजारी पडता उपयोगी नाही हं...आज रात्री तर आपलं लग्न आहे!"

सावली म्हणाली, "मला इतका विचित्र अनुभव आला आहे आता या क्षणी की सांगता सोय नाही. माझ्या सावलीचं हळवं मन चिडायला फारसा वेळ लागत नसतो. मग विचार कर की माझ्या सावलीला वेड लागल्यावर काय होईल? माझ्या सावलीला वाटू लागलंय की ती सावली नसून खराखुरा माणूस आहे!.. आणि मी?....वेडाच्या भरात मलाच ती तिची स्वतःची सावली समजते!"

राजकन्या एकदम उद्गारली, "बापरे! किती भयंकर!! तुमच्या सावलीला वेड्यांच्या तुरुंगाच्या कोठडीतच ठेवायला हवं...."

"ठेवलंय तर! अरेरे! मला वाटतं, बिचाऱ्या माझ्या सावलीचं डोकं पुन्हा कधीच ताळ्यावर येणार नाही! फार वाईट झालं!"

राजकन्या म्हणाली, "बिचारी सावली! किती दुर्दैवी! तिच्या या वेडाच्या दुःखद आयुष्यातून तिला कायम मुक्त करणंच बरोबर होईल. विचार करा बरं जरा. मला तर वाटतं, जरादेखील गाजावाजा न करता तिचा शेवटच करायला हवा."

मनुष्यरूपधारी सावली साळसूदपणे म्हणाली, "तिचा शेवट करायचा ही किती कठीण गोष्ट! ही सावली एक फार चांगला नोकर होता बिचारा माझा...." असे म्हणून सावलीने एक मोठा थोरला उसासा टाकल्यासारखे केले.

राजकन्या म्हणाली, "किती उदार नि कोमल मन आहे तुमचं !—"

त्या रात्री साऱ्या शहरभर रोषणाई केली होती. तोफांचे 'धुडुम,' आवाज निघत होते, आणि सशस्त्र सैनिक कवाईत करीत होते. थाटाचा लग्नसमारंभ होता तो. राजकन्या आणि मनुष्यरूपधारी सावली प्रजेला दर्शन देण्यासाठी जोडीने सज्जात गेले. लोकांनी आनंदात टाळ्या पिटल्या त्यांना पाहून. परंतु !— त्या विद्वान माणसाला यातले काहीही ऐकू आले नाही. दिसले नाही. कारण त्यांनी त्याचा आधीच शेवट केला होता........

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १७०४९ नों दि ............
वि. ........ बा. वा. ........



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अ. क्रम ५८१६४.... वि. बा. वा.
क्रमांक ३५४५.....नोंद दि. ५.१.२००५
IRBK-0114049